परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव।'

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष ९ • अंक ६ • फेब्रुवारी–मार्च २०१६

### मुखपृष्ठाविषयी

परमपिता शिव परमात्मा या सृष्टीरूपी नाटकाचे मुख्य ॲक्टर व डायरेक्टर आहेत. तेच स्वर्गाचे निर्माते असल्याने त्यांना 'हेवनली गॉड फादर' असेही म्हटले जाते. कलियुगाच्या अंती जेव्हा ही सृष्टी पतित तमोप्रधान (नर्क) बनते, तेव्हा त्यांचे अवतरण 'प्रजापिता ब्रह्मा' यांच्या शरीरात होते. त्यांच्याद्वारा परमात्मा स्वर्गाची स्थापना करतात. म्हणूनच या समयाला 'पुरुषोत्तम संगमयुग' असेही म्हटले जाते. हे युग अतिशय महान, परम कल्याणकारी आहे. कारण याच वेळी शिव परमात्मा, भक्तांना त्यांच्या भक्तीचे फळ सत्य ज्ञान देतात. या ज्ञानानेच मानव देव बनतो. **अशाप्रकारे शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण हाच विश्वपरिवर्तनाचा आधार आहे. म्हणूनच महाशिवरात्री अतिशय आनंदाने साजरी केली जाते.**

मुखपृष्ठावरील चित्रात हाच आशय दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. चार चौकोन हे चार युगाचे प्रतीक आहेत व त्यांच्या केंद्रस्थानी स्वयं परमात्मा, शिवलिंगाच्या रुपाने दर्शविण्यात आले आहेत. तसेच पक्षी हा संगमयुगात ईश्वरी ज्ञान व सहज राजयोगाचे पंख प्राप्त करणाऱ्या आत्म्याचे प्रतीक आहे, जो सदैव उडती कला अनुभवत असतो. त्याचबरोबर पिता शिव परमात्मा सर्व आत्म्यांना मुक्ती व जीवनमुक्तीचा वारसा प्रदान करतात.

**- प्रकाशक अमृतकुंभ**










| | | |
|---|---|---|
| १. | महाशिवरात्री - शिव अवतरणाचे यादगार पर्व (संपादकीय) | २ |
| २. | प्रिय वत्सांनो, मी आहे तुमचा पिता (कविता) | ५ |
| ३. | प्रश्न आपले उत्तर दादी जानकीजींचे | ६ |
| ४. | ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता | ९ |
| ५. | त्याग, तपस्या व सेवामूर्त ओमप्रकाश भाईजी | १२ |
| ६. | जो सदा साक्षी स्थितीत राही... | १३ |
| ७. | वाचकांशी हितगुज, होळीचा वास्तविक अर्थ | १५ |
| ८. | सचित्र सेवावृत्त | १६ |
| ९. | प्रभु शृंगार - दादी जानकीजी | १८ |
| १०. | 'यू टर्न' | २२ |
| ११. | आपल्या जीवनाचे लक्ष्य काय असावे? | २४ |
| १२. | सद्गुरू परमात्म्याच्या अवतरणाचा दिव्य संदेश | २५ |
| १३. | ईश्वर आहेच मात्र त्याचा शोध घेण्यासाठी... | २७ |
| १४. | सद्गुरू बिना कौन बताए बात? (कविता) | २९ |
| १५. | जेथे जातो तेथे, तू माझा सांगाती (अनुभव) | ३० |
| १६. | आध्यात्मिक विकासाद्वारेच समाजाचा सर्वांगीण विकास संभव | ३२ |


**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :** संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३, • **वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** बी.के.गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.
फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२ • E-mail :info@amrutkumbh.com.

डिमांड ड्राफ्ट 'अमृतकुंभ' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. ६०/– • अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/- • आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**

**E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या www.amrutkumbh.com**

**(एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीसाठी वार्षिक वर्गणी रु. ६५/- इतकी असेल.)**




संपादकीय...

# महाशिवरात्री - शिव अवतरणाचे यादगार पर्व

महाशिवरात्री हे सर्वात महान पर्व आहे कारण त्यामुळे सर्व आत्म्यांचे परमपिता शिव परमात्म्याची स्मृती जागृत होते. भारतात भगवान शिवाची लाखो मंदिरे अस्तित्वात आहेत. भारतात असे एकही गाव नसेल जेथे शिव मंदिर नाही असा एकही धर्मग्रंथ नसेल ज्यात शिवाची महिमा नाही. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे तरीही शिव परमात्म्याचा यथार्थ परिचय मनुष्य आत्म्यांना नाही. कोणी शिवालाच शंकर मानतो, तर कोणी परमात्मा सर्वव्यापी समजतो. कोणी शिवोऽहम् म्हणतो, तर कोणी ब्रह्म ईश्वर आहे असे समजतो. कोणी प्रकृतीलाच ईश्वर मानतो, तर कोणी आपल्या इष्ट देवी-देवतांनाच ईश्वराचे रूप मानतो. कोणी म्हणतो ईश्वर नाहीच जर असेल तर आम्हाला पुरावा द्या... अशी अनेकानेक मते पहायला मिळतात. त्यामुळेच गायन केले जाते.

**'जनम जनम लगाये फेरे,**
**फिर भी हर दम दूर रहे।'**

आपण परमेश्वराच्या प्राप्तीसाठी जन्मजन्मांतर भक्ती केली. त्या भक्तीचे फळ; सत्यज्ञान देण्याकरिता प्रत्येक कल्पात कलियुगाचे अंती परमपिता शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण या भारत भूमीवर होते. याचीच यादगार (स्मरण) म्हणून भारतवासी महाशिवरात्रीचे पर्व मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरे करतात.

### शिव परमात्म्याचे अवतरण - कधी व कसे?

परमात्म्याचे सर्व धर्म मान्य स्वरूप आहे, निराकार, ज्योतिस्वरूप, प्रकाश, ज्योति, नूर, लाइट इत्यादी. त्याचे कर्तव्यवाचक नाव आहे शिव अर्थात कल्याणकारी. तो परमधामनिवासी आहे. त्याचा जन्म देवता किंवा मनुष्य सदृश होत नाही. याचेच गायन गुरु नानक देवजींनी अतिशय सुंदर शब्दात केले आहे. 'एक ओंकार, सतनाम, कर्तापुरुष, निरभय, निवैर, अकालमूरत अजूनि...' तोच दु:खहर्ता, सुखकर्ता आहे, पतितपावन, पापकटेश्वर,मुक्तेश्वर, वा सद्गतिदाता आहे. तो सर्व शक्तिवान आहे. मुख्य म्हणजे तो स्वर्गाचा रचयिता (Heavenly God Father) आहे. तसेच विश्वातील सर्व आत्म्यांचा पिता आहे.

कलियुगाच्या अंती जेव्हा ही सृष्टी पतित, तमोप्रधान बनते तेव्हा तिला पुन्हा पावन, सतोप्रधान बनविण्यासाठी, निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण, साकार माध्यम 'प्रजापिता ब्रह्मा' यांच्या शरीरात परकाया प्रवेश करून होते. यालाच शिव परमात्म्याचा दिव्य अलौकिक जन्म म्हटले जाते. शिव परमात्मा ब्रह्मा मुखकमलाद्वारे ईश्वरी ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देऊन, पतित मनुष्यांना पावन देवता बनविण्याचे दिव्य कर्तव्य करतात. **आपणा सर्वांना हे जाणून अत्यानंद होईल की सन १९३६ मध्ये शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात झाले आहे. त्यामुळे यावर्षी आपण ८०वी त्रिमूर्ती शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी करीत आहोत.** शिव परमात्म्याद्वारे स्थापित प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाद्वारे सत्य ईश्वरी ज्ञानाचा प्रकाश संपूर्ण विश्वात पसरला आहे. याचेच गायन केले जाते. 'ज्ञानसूर्य प्रगटा, अज्ञान अंधेर विनाश' जसा सूर्य उगवल्यावर अंध:कार आपोआपच नाहीसा होतो; तसा ज्ञानसूर्य शिव परमात्मा सृष्टीवर अवतरित झाल्यावर अज्ञान अंध:कार नष्ट होतो. **या अनुषंगाने शिव परमात्म्याची पुढील महावाक्ये अतिशय उद्‌बोधक आहेत. 'मीठे बच्चे, मनुष्य तो कह देते है कि कलियुग मे अभी ४० हजार वर्ष पडे है। उसको कहा जाता है घोर अन्धियारा। बाप ज्ञानसूर्य आता है तो तुम्हारा भक्तिमार्ग का अज्ञान मिट जाता है। भक्ति है रात, ज्ञान है दिन। बाप ही आकर दिन बनाते है।''**

## महाशिवरात्रीचे आध्यात्मिक रहस्य

महाशिवरात्री निराकार शिव परमात्म्याच्या दिव्य अवतरणाचे यादगार पर्व आहे. दरवर्षी ते माघ महिन्याच्या वद्य चतुर्दशीला साजरे केले जाते. माघ महिना हा भारतीय कालगणनेनुसार अंतिम फाल्गुन महिन्याआधीचा महिना आहे. त्यातील चतुर्दशीची रात्र ही काही स्थूल रात्रीची सूचक नाही तर ही रात्र आध्यात्मिक दृष्टिकोनातून कलियुगाच्या अंती सर्वत्र व्याप्त घोर अज्ञान अंध:काराचे प्रतीक आहे. कलियुग पूर्णत: संपण्यापूर्वी काही वर्षे अगोदर जेव्हा सृष्टीवर अति धर्मग्लानी होते; काम-क्रोधादी विकारांच्या वशीभूत मानव दु:खी व अशांत होतो; भ्रष्टाचाराचा बोलबाला होतो तेव्हा परमात्मा या सृष्टीवर अवतरित होतो. म्हणूनच गायन केले जाते – 'ब्रह्माद्वारे नवसृष्टीची स्थापना' याविषयी शिवपुराणात देखील म्हटले आहे की, मानवमात्राला अनुग्रह देण्यासाठी शिव परमात्मा, ब्रह्माच्या ललाटी प्रकटले व त्यांना आपले माध्यम बनवून त्यांच्यामार्फत सत्ययुगी दैवी सृष्टीची स्थापना केली म्हणूनच 'प्रजापिता ब्रह्मा' यांना भगवंताचा भाग्यशाली रथ किंवा वाहन असेही म्हटले जाते. याचेच प्रतीक म्हणून शिव मंदिरात नंदीची पूजा केली जाते. तसेच शिवलिंग हे ज्योतिस्वरूप परमात्म्याचे प्रतीक असल्याने, त्याला ज्योतिर्लिंग असे म्हटले जाते. (लिंग अर्थात प्रतिमा) त्याचबरोबर नंदीच्या शिंगावर हात ठेऊन शिवाचे दर्शन घेण्याची पद्धत आहे. याला कारण म्हणजे शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या भृकुटीमध्ये बसून ज्ञान देतात.

## परमात्मा शिव सर्व आत्म्यांचे परमपिता आहेत

परमपिता परमात्मा शिवाचा परिचय जर सर्व मनुष्य आत्म्यांना दिला तर सर्व धर्म व संप्रदाय एकसूत्रात बांधले जातील. कारण सर्व धर्मांची हीच मान्यता आहे की परमात्मा निराकार ज्योतिस्वरूप आहे. फक्त त्याला कोणी ईश्वर गॉड, अल्लाह, प्रभु, मालिक सिद्धशिलापति, चिनकुनशेकी वा वाहेगुरु म्हणून संबोधित केले. जसे एकाच व्यक्तीला कोणी 'काका' तर कोणी 'मामा' तर कोणी वडील... असे वेगवेगळ्या रीतीने संबोधित केले तरी ती व्यक्ती मात्र एकच असते तसेच परमात्म्याला देखील वेगवेगळ्या नावाने संबोधित केले तरी सर्व धर्मात तो एकच दर्शविण्यात आला आहे. तो निराकार, ज्योति स्वरूप, परम प्रकाश पुंज आहे. तोच सर्व देवांचा देव महादेव आहे. तोच श्रीकृष्ण व श्रीरामचंद्राचा इष्ट वा आराध्य आहे. गोपेश्वर व रामेश्वर ही शिवमंदिरे याची आजही साक्ष देतात. यावरून आपल्या लक्षात आले असेल की महाशिवरात्रीचा उत्सव हा खऱ्या अर्थी सर्व धर्मांसाठी उत्सव आहे तसेच परमात्म्याची अवतरण भूमी भारत ही सर्व धर्म वाल्यांसाठी परम पवित्र तीर्थस्थान आहे. **याविषयी शिवपित्याची पुढील महावाक्ये सदैव लक्षात ठेवा, ''बच्चे, मै भारत में ही आता हूँ। यहाँ बैठ सारे विश्व की सद्‌गति करता हूँ।' सभी आत्माओंको मुक्ति–जीवनमुक्ति का वर्सा**

**देता हूँ। मै आया हूँ सारी दुनिया को दु:खोसे लिबरेट (मुक्त) कर, शांतिधाम, सुखधाम ले जाने।''**

**शिव रचयिता आहे व शंकर रचना आहे.**

भक्तगण शिव व शंकर एकच समजतात परंतु ते अयथार्थ आहे कारण कलियुगाच्या अंती धर्म ग्लानीच्या समयी, शिव परमात्मा सृष्टीच्या कल्याणार्थ, सर्वप्रथम ब्रह्मा, विष्णु व शंकर या तीन सूक्ष्म देवता निर्माण करतो तोच ब्रह्माद्वारे सत्ययुगी दैवी सृष्टीची स्थापना, शंकराद्वारे कलियुगी आसुरी दुनियेचा महाभारी विनाश आणि विष्णुद्वारे दैवी सृष्टीची पालना करतो. शिव परमात्म्याच्या या दिव्य कर्तव्यामुळेच त्याला 'त्रिमूर्ती शिव भगवान अथवा कर्ताकरविता असे म्हटले जाते. यावरून आपल्या लक्षात आले असेल की शिव रचयिता आहे व शंकर रचना आहे. शिव परमात्मा निराकारी तर शंकर देवता आकारी आहे. शिव परमात्मा परमधाम निवासी आहे. शंकर सूक्ष्म वतनवासी आहे. शंकराला नेहमी ध्यानस्थ दाखवितात. वास्तविक शंकर देखील शिवाचेच ध्यान करीत असतो. कारण शिव हेच सर्वांचे आराध्य परमपिता आहेत. म्हणूनच शास्त्रातून गायन केले जाते. 'ब्रह्मा देवताय नम:, विष्णु देवताय नम:, शंकर देवताय नम: व शिव परमात्माय नम:' त्याचबरोबर शिव परमात्म्याच्या या दिव्य कर्तव्यामुळेच शिवलिंगावर त्रिपुंड लावून, बेलपुष्प अर्पित करतात.

**शिव पित्याकडून मिळणारा बेहदचा वारसा**

लेखाच्या पूर्वार्धात आपण पाहिले की सर्व आत्म्यांचा पिता एक शिव परमात्मा आहे. तोच दु:खहर्ता व सुखकर्ता आहे. कलियुगाचे अंती ही सृष्टी जेव्हा दु:खधाम वा नर्कतुल्य बनते तेव्हा तिचा विनाश करून, सुखधामाची वा स्वर्गाची स्थापना करतो. तसेच आपल्या लाडक्या मुलांना (अर्थात आज्ञाधारक आत्म्यांना) बेहद विश्वाच्या बादशाहीचा वारसा देतो. **या अनुषंगाने शिव परमात्म्याची ज्ञानमुरलीतील पुढील महावाक्ये अतिशय अर्थपूर्ण आहेत, ''मीठे बच्चे, बेहद का बाप तुम्हे बेहद विश्वकी बादशाही देते है। इसलिये गायन भी है, ऐसी कोई अप्राप्त वस्तू नही जिसके लिये पुरूषार्थ करना पडे। वह भी आज्ञाकारी, वफादार बच्चों को ही देंगे ना! आज्ञाकारी अर्थात बाप जो डायरेक्शन देते है, उस पर चलनेवाला। बाप कहते है मेरे पास है ही विश्व की बादशाही, जिसको स्वर्ग कहा जाता है।**

अशाप्रकारे परमात्मा शिव पिता (शिव बाबा) आपल्या लाडक्या मुलांना स्वर्गाची बादशाही देण्याकरिता आला आहे, त्यामुळे जी सपूत आज्ञाधारक मुले आहेत त्यांचे मन अत्यानंदाने व प्रेमाने सदैव हेच गीत गात असते.

**हमारा प्यारा बाबा आ गया।**
**हमारा मीठा बाबा आ गया।**
**हमे बादशाही देने आ गया।**
**हमे वापस घर लेने आ गया।**
**हमे आपसमान बनाने आ गया।**

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे परमात्मा पित्याची आपल्या आत्मारूपी मुलांना, मुख्य आज्ञा हीच आहे की, 'मुलांनो, आत्मअभिमानी बना व माझी आठवण करा.' आत्मअभिमानी बनल्यानेच आपण मनुष्यापासून देवता अथवा पतित, विकारीपासून पावन, निर्विकारी बनतो. याद्वारेच स्वपरिवर्तन तसेच विश्वपरिवर्तन घडून येते. आपण जर सृष्टिचक्राचा थोडक्यात विचार केला तर त्यात मुख्य दोन भाग आहेत. १) स्वर्ग अर्थात सत्ययुग व त्रेतायुगाचा २५०० वर्षाचा कालावधी २) नर्क अर्थात द्वापरयुग व कलियुगाचा २५०० वर्षाचा कालावधी. स्वर्गात देवीदेवता आत्मअभिमानी असल्याने सदा सुखी असतात. म्हणून त्याला सुखधाम असेही म्हटले जाते. तर याउलट द्वापर कलियुगात मनुष्य देहअभिमानी असल्याने दु:खी असतो. म्हणूनच याला दु:खधाम म्हणतात. मुख्य म्हणजे देहअभिमानातूनच कामक्रोधादी विकारांची उत्पत्ती होते, जे सर्व दु:खाचे मूळ आहे.

म्हणूनच या ५ विकारांपासून मुक्त होण्यासाठी शिव परमात्म्याने सोपी युक्ती सांगितली आहे. 'दे दान तो छुटे ग्रहण'. मनुष्य आत्म्याला माया अर्थात ५ विकारांचे जे ग्रहण लागले आहे त्यातून मुक्त होण्यासाठी परमात्मा आपल्याकडे ५ विकारांचे दान मागतात. प्रत्येक कल्पात अशाप्रकारे जे मनुष्यआत्मे विकारांचे दान देतात ते भविष्य २१ जन्मांकरिता पावन देवीदेवता बनतात. संगमयुगात

पतितपावन शिव परमात्म्याला आपण जे विषतुल्य विकारांचे दान देतो; त्याचेच प्रतीक म्हणून भक्त विषारी धोतऱ्याचे फूल शिवलिंगावर वाहतात. वस्तुत: धोतऱ्याचे फूल वाहिल्यानंतर शिव परमात्मा प्रसन्न कसा होईल? त्याला जर खरोखर प्रसन्न करून घ्यायचे असेल तर मात्र महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर ५ विकारांचे दान द्या आणि एकदा दिलेले दान मात्र परत घेऊ नका. असे केल्यानेच मानव देवतातुल्य बनतो.

महाशिवरात्रीला भक्त मंदिरात 'बम बम भोले, भेज दे सोने चांदीके गोले'' असा उद्घोष करतात. परंतु त्यांना हे माहीत नाही की सोन्या चांदीचे गोळे म्हणजे नेमके काय? वास्तविक सोन्याचा गोळा म्हणजे सत्ययुगी सृष्टी Golden Age व चांदीचा गोळा म्हणजे त्रेतायुगी सृष्टी Silver Age. सत्ययुगी व त्रेतायुगी सृष्टीलाच स्वर्ग असे म्हणतात. या स्वर्गाची स्थापना स्वयं शिव परमात्मा, ब्रह्माद्वारे करवितात. म्हणूनच शिव परमात्म्याला 'स्वर्गाचा रचयिता' असे म्हटले जाते. **याविषयी शिव परमात्याची महावाक्ये आहेत, ''मीठे बच्चे, बेहद के बाप से तुम्हे स्वर्ग की बादशाही मिलती है। शिवजयन्ति मनाते है, तो जरूर शिवबाबा आकर विश्व का मालिक बनाकर गये होंगे। तब तो उनकी जयन्ती मनाते है। लाखो वर्ष की बात नही है। ५००० वर्ष की बात है। परंतु तुम यह भूल गये हो कि बाबा से हमें स्वर्ग का वर्सा मिलता है।''**

**महाशिवरात्रीचा पावन संदेश.**

महाशिवरात्री अर्थात अज्ञानाची रात्र आता संपली आहे. भारतात शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण झाले आहे. ही भारतभूमी पुन्हा लवकरच स्वर्गभूमी बनणार आहे. सध्या चालू असलेल्या संगमयुगात (कलियुगाचा अंत व सत्ययुगाचा आदि यांचा संधीकाळ) आपण श्रेष्ठ पुरुषार्थाद्वारे नरापासून श्रीनारायण व नारीपासून श्रीलक्ष्मी बनू शकतो. त्यामुळे **परमात्मा शिव पित्याला ओळखा, त्याच्याशी सर्व संबंध जोडा व त्याच्या श्रीमतानुसार आपले तन-मन-धन-समय-श्वास-संकल्प सफल करा. आपले जीवन खऱ्या अर्थी हिरेतुल्य बनबा**. त्याचबरोबर हे ही लक्षात ठेवा की लवकरच या कलियुगी तमोप्रधान सृष्टीचा महाभारी विनाश होणार आहे. तत्पूर्वी परमात्मा शिव पित्याकडून भविष्य २१ जन्मांकरिता स्वर्गीय राज्यभाग्याचा ईश्वरी जन्मसिध्द अधिकार अवश्य प्राप्त करा. **शेवटी पुन्हा आपणा सर्वांना महाशिवरात्रीच्या पद्मापद्म मंगलकामना!**

**- ब्रह्माकुमार शिवाजी**

■■



# प्रिय वत्सांनो, मी आहे तुमचा पिता

प्रिय वत्सांनो मी आहे तुमचा,
पारलौकिक पिता।
जाणिव याची तुम्हास देण्या,
भूवर आलो स्वतः ।।धृ।।

तुम्ही गळ्यातील ताईत माझ्या,
आणि जीव की प्राण।
काय गमविले तुम्ही तयाची,
तुम्हाला नाही जाण।
तुम्हीच होते सुखधामातील,
देवी आणि देवता।
जाणिव याची तुम्हास देण्या
भूवर आलो स्वतः।।१।।

शिंपल्यात बघ तयार होई,
स्वाति जलाचे मोती।
सर्पमुखी परी गोड दूधही,
विषाक्त होते किती?
संगत जशी करिशी वत्सा,
तसेच तुम्ही होता।
जाणिव याची करूनी देण्या,
भूवर आलो स्वतः।।२।।

प्रिय बाळांनो, माझ्या स्मरणी,
सदा रंगुनी जा रे।
पवित्रतेच्या श्रेष्ठ पुरुषार्थाने,
फिरूनी देवता व्हा रे।
युगायुगांचे तुम्हीच वारस,
खरे सांगतो आता।
जाणिव याची तुम्हास देण्या,
भूवर आलो स्वतः।।३।।

(संदर्भ: दिवंगत ब्र.कु. गौतम सुत्रावे, यांनी लिखीत 'ज्ञानसुधा ही शिवबाबांची' पुस्तिका)

# प्रश्न आपले उत्तर दादी जानकीजींचे



प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुख्य प्रशासिका आदरणीय दादी जानकीजी दिव्य बुद्धीच्या वरदानाने संपन्न आहेत. परमात्मा पिता शिवबाबांनी दादींना अनेक विशेषणांनी गौरविले आहे. सदैव एक बाप आणि सेवेत मग्न असणाऱ्या, ज्ञानयज्ञाच्या आरंभापासून आतापर्यंत बाबांशी एकनिष्ठ, मर्यादा पुरूषोत्तम, प्रकृतीजीत, मम्मांप्रमाणे बाबांची मुरली तन्मयतेने ऐकून तो सहज सोपी करून सर्वांना धारणा करविणाऱ्या, आदि रत्न दादी जानकीजी बापसमान साक्षात्कारमूर्त आहेत. बुद्धिवंतांचाही बुद्धिदाता ज्ञानसागर शिवबाबांनी जानकी दादींना अशी कला दिली आहे की कर्माची गुह्य गती त्या समजावून सांगतात, विविध प्रकारच्या प्रश्नांना समर्पक उत्तर देऊन सर्वांना संतुष्ट करतात. पाहूया ब्रह्मावत्सांनी विचारलेल्या प्रश्नांना जानकी दादींनी दिलेली उत्तरं - **संपादक**

**प्रश्न १ : राजयोग काय आहे?**

**उत्तर :** राजयोग म्हणजे शिवबाबांना माझ्याकडून काय पुरुषार्थ अपेक्षित आहे. बाबांनी दृष्टी देऊन आपली बघण्याची नजरच बदलून टाकली आहे. **पहायचं असेल तर काय पहावं, काय ऐकावं हाच खरा राजयोग आहे. ज्याने बळ मिळतं. मला काय पहायचं, ऐकायचं, बोलायचं आहे. याविषयी आपण जितके जागरूक असू अर्थात कर्मामध्ये जितकी स्वच्छता असेल तितके आपण सुरक्षित राहू. थोडासा शिंतोडा उडाला तरी ते लाजिरवाणे होईल.** ती आपलीच चूक असेल. त्यासाठी मग कारणं देता येणार नाहीत. कोणालाही दोष न देता फायदा असेल अशी चांगली गोष्ट जरूर स्वीकार करा. काहीतरी कारण आठवून सांगणे, घडून गेलेले मनात धरून ठेवणे हा वेळेचा अपव्यय आहे. जीवनात एकतर वरदान आहे किंवा चिंता आहे. म्हणूनच जशी घाई नको; तशीच काळजीही नसावी.

**प्रश्न २ : राजयोगाच्या (ज्ञान, योग, धारणा व सेवा) चारही विषयांमधील संतुलनाचा अर्थ काय?**

**उत्तर :** योगयुक्त स्थितीमध्ये राहून ज्ञान ऐकवलं तर इतरांचाही शिवबाबांशी योग लागेल. ज्ञान कितीही चांगले आत्मसात केलं असेल पण जर योग नसेल तर बाबांशी संबंध जोडता येणार नाही. असे ज्ञान एका कानाने ऐकून दुसऱ्या कानावाटे निघून जाईल. योगाची अनुभूती करविता येणार नाही.

२. कोणतीही वाईट गोष्ट स्वत:च्या व इतरांच्याही मनात राहू देऊ नये. चांगलं तेच लक्षात ठेवावं. निरुपयोगी गोष्टी विसरून जाव्यात. माझं मन एकदम बंधनमुक्त आहे. कुठलीही गोष्ट बुद्धीला आकर्षित करता कामा नये.

३. सेवेत गुंतून राहिलो तर मायेला येण्याची संधीच मिळणार नाही. पण म्हणून फक्त स्वत:ला गुंतवून ठेवण्यासाठीच सेवा करू नये. सेवा करायला मिळणे हे माझं भाग्य आहे. त्यागाचं भाग्य आहे. मम्मा–बाबांची त्यागवृत्ती पाहून सर्वांना त्याग करणे सोपे गेले. देहधारी सगेसोयऱ्यांची जरासुद्धा आठवण राहिली नाही. आश्चर्य वाटतं की एवढा त्याग कसा घडून आला.

**४. ईश्वरी सेवा ही त्याग आणि तपस्येवर आधारित आहे. मला मान सन्मान मिळावा, पद मिळावं यासाठी केलेली सेवा ही खरी सेवा नाही. ईश्वरीय सेवेत वेळ सफल होत आहे हे माझं भाग्य आहे. अशी सेवा ही आपली स्थिती मजबूत करण्याचं साधन आहे ज्याने आपसूकच छोट्या मोठ्या गोष्टी सहज सोप्या होऊन जातील.**

**प्रश्न ३ : चांगली स्थिती बनविण्यासाठी काय करावे?**

**उत्तर :** आपल्या स्थितीमध्ये खरेपणा, स्वच्छता तसेच साधेपणा हवा. जितका साधेपणा असेल तितके आपण सुखी राहतो म्हणूनच मला अमुक एक पाहिजे, ते मिळायला हवं... याची काहीच आवश्यकता नाही. पाहिजे पाहिजे अशा स्वभावाने खूप नुकसान होते. बाबांच्या माझ्याकडून ज्या अपेक्षा आहेत त्या पूर्ण करायच्या आहेत इतकंच लक्षात ठेवायला हवं. या **संगमयुगात बाबांची लाडकी मुले (राजे बच्चे) व्हा; हे बाबांचं सांगणं नेहमीच शिरोधार्थ माना. समोरची व्यक्ती कशीही असली तरी तुम्ही**

**क्षमाशील बना. अंत:करणात खरेपणा आणि प्रेमाचं भांडार सदैव भरपूर असावं, दाता होऊन देत रहा. वरदाता शिवबाबा आणि भाग्यविधाता ब्रह्माबाबा आहेत.** आपलं भाग्य आहे की अन्न वस्त्र, राहण्याची व्यवस्था सगळं न मागता बाबांकडून मिळतं. मन स्वच्छ ठेवलं तर बाबांकडून जे हवं ते स्वत:च मिळू शकतं. कोणत्याही व्यक्तीची कुठलीही गोष्ट मनात धरून ठेवली तर बाबांची दृष्टी मिळणार नाही. एखादी घटना घडली, तेव्हा बाबांसमोर बसल्यानंतर ती गोष्ट समोर आली तशी निघून गेली; अशी अवस्था असायला हवी. आम्ही असं केलं आहे म्हणूनच तर आपल्याला सांगत आहे. आता बाबांचं सांगणं आहे की, शिवशक्ती व्हा. आणखी काय हवं?

### प्रश्न ४ : संपन्न व संपूर्ण बनण्याचा पुरुषार्थ कोणता?

**उत्तर :** सेकंदामध्ये पूर्णविराम (फुलस्टॉप). सेकंदात मुक्ती त्यानंतर जीवनमुक्ती. मन शांत आणि सगळी कर्मेन्द्रिये शीतल झाली पाहिजेत. मनापासून पाहा की बाबा समोर आहेत. असा अभ्यास करत रहा. ज्या संकल्पाची आवश्यकता नाही तो उत्पन्नच होऊ नये. तरीही मनात असा विचार आलाच तर एक सेकंदामध्ये शांत व्हावा. काय करू कसं करू, अशाप्रकारे हवालदिल न होता विचार करून सेकंदात स्वत:ला बंधनमुक्त करा. आत्मा तर मुक्त आहेच. ना भूतकाळातील ना भविष्यातील गोष्टी; माझा वर्तमानकाळ शांत आहे, मन प्रसन्न आहे, सगळ्या शक्ती उत्तम साथ देत आहेत. ज्या क्षणी ज्या शक्तीची आवश्यकता आहे ती शक्ती मला मदत करीत आहे. अमुक एक शक्ती काम करत नाही. अशी तक्रार असता कामा नये. ती काही अभिमानाची गोष्ट नव्हे. लक्ष्य समोर आहे आणि तिथपर्यंत पोहोचायचं आहे यातच खरी शान आहे. बाबा म्हणतात की निशाणाला हात लावून परत या. अशी माझी एकाग्रता त्याच निशाण्याप्रती असावी, यातच माझी खरी शान आहे.

मनापासून प्रेमाने स्वत:शी, सर्वांशी जुळवून घेतलं तर आपल्यावार साहेब शिवबाबाही खुश असतात. ही बाजी आहे एका मिनिटाची. निव्वळ स्वत:पुरतं कामचलाऊ खुश होऊन उपयोग नाही. मनाशी विचार करा की मी कोणावर नाराज तर नाही. **अशा प्रकारे स्वमानात राहून सगळ्यांना सन्मान देत रहा. बाबा म्हणतात की माझ्या श्रेष्ठ शिकवणीनुसार आपलं आचरण ठेवा. आपण सगळ्या विश्वासाठी आधारमूर्त आहोत, आपल्याला कोणत्याही आधाराची आवश्यकता नाही. मुखावाटे निघणारे शब्द आणि आपले आचरण यात समानता हवी.**

### प्रश्न ५ : शिवबाबांना कोणती मुले फार आवडतात?

**उत्तर :** ज्यांना शिवबाबा प्रिय आहेत अशी मुले बाबांना आवडतात. काही कारणामुळे मधेच बाबांकडे पाठ फिरवली, त्यांची आज्ञा मानली नाही, श्रीमताचं उल्लंघन झालं तर त्यात आपलं नुकसान आहे. याउलट अमृतवेळेपासून रात्री झोपेपर्यंत बाबांनी जे नियम, ज्या मर्यादा घालून दिल्या आहेत त्यानुसार आपलं आचरण ठेवलं तर खूप शक्ती मिळते. कोणतीही सेवा तनाने, मनाने किंवा धनाच्या रूपाने असेल, तर बाबा ती करवून घेतात. यात विश्वकिशोर भाऊ नंबरवन होते. त्यांनी कधीही म्हटलं नाही की अमुक एक गोष्ट मी केली. नाही, बाबांनी माझ्याकडून करवून घेतलं. बाबा, आम्ही तुमच्याजवळ स्मृतीने कायम असू. तुमच्याबरोबरच भोजन स्वीकार करू - त्याचं सुख अवर्णनीय आहे. मग कोणतेही प्रश्न उरत नाहीत. शिवबाबांच्या मधुर स्मृतीमध्ये आपण जितके रममाण होऊ तितकी मित्र, संबंधी कोणाचीही आठवण उरणार नाही. **कान उघडे ठेऊन भगवंताचं सांगणं ऐकून ते अंत:करणात साठवून घ्यावं आणि या जीवन यात्रेचा एक एक क्षण सफल करावा, यातच तो परमात्मा पिता खुश आहे. हाती असलेला वेळ सफल करा, जेणेकरून दुसरे तुम्हाला पाहून काहीतरी शिकतील. संपूर्ण विश्व हे सेवेसाठी खुलं आहे. बाबांकडून मिळालेला खजिना प्रत्येकाला देण्याच्या सेवेत सहयोगी बना.** आत्ता सफल करण्यासाठी व करवून घेण्यासाठी वेळ आहे. शिवबाबा ज्यात खुश असतील तेच मला करायचं आहे. आपल्याला पवित्र, सुंदर बनविण्यासाठीच तर परमेश्वर या भूतलावर आला आहे. मग अशा बाबांची आपण किती आठवण ठेवली पाहिजे. त्यांच्याकडून अपार आनंद मिळतो म्हणूनच तर प्रेम आहे. आजकाल सर्वजण खोटं बोलणं, वागणं, खोटा व्यवहार यामुळे थकून गेलेत. अशावेळी आपण खरं होऊन राहिलो तर शिवबाबांच्या कार्यात मदत करू शकू. फक्त एकच ध्यास ठेवा की मला खरं बनायचंय.

### प्रश्न ६ : अभिमान व मोह सोडण्यासाठी काय चिंतन करावे?

**उत्तर :** आत्मा ६३ जन्मांपासून अभिमानी बनला आहे. ज्या संबंधांचा अभिमान वाटतो त्यात लोभ व मोहसुध्दा दिसून येत आहे. या लोभ

मोहापायी, अभिमानापायी राग येतो. **एखाद्या व्यक्तीमध्ये; थोडासा जरी क्रोध असेल तर समजावं की तिथे अभिमान आहे. त्यामुळे मग समाधान नाही. ब्रहमाबाबांना कायम समोर पाहिलं तर आपला अभिमान गळून पडतो. जसं ब्रहमाबाबांनी त्यांच्या अंतिम श्वासापर्यंत स्मृतिस्वरूप राहण्याचा पार्ट बजावला. निराकारी स्थितीत राहून निरहंकारी रूप प्रत्यक्ष केलं. तिळमात्रही अहंकार वा आवेश कोणाला दिसला नाही. आता अव्यक्त स्वरूप धारण करूनही सगळ्यांवर ते किती प्रेम करतात. समजावून सांगतात. बाबा म्हणत असत, 'मुलांनो, ज्याची सर्व कर्मेन्द्रिये शीतल शांत झाली आहेत व जो आपल्या वागणुकीतून इतरांनाही शांतीची अनुभूती करवतो तोच खरा योगी!'**

कोणत्याही कारणामुळे क्रोध येऊ देऊ नये. आवेश आला तर नापास होऊ. एखादा योगी जेव्हा मधुर शांतीचा अनुभव घेतो तेव्हा त्याची कर्मेन्द्रिये शीतल होतात. संगमयुगात मधुवन, ओम शांती भवन आहे. पण आपलं वास्तविक घर शांतीधाम आहे, आपण इथे पाहुणे आहोत ही सदैव स्मृती ठेवणे हे महान आत्म्याचं कर्तव्य आहे. ईश्वराचं आपल्यावर किती प्रेम आहे! अंतिम जन्मातही माझ्या मुलांना कोणताही त्रास न होवो असा तो सांभाळ करत आहे. अशा बाबांची आपल्याला इतकी आठवण असावी की जो कुणी समोर येईल त्यालाही शिवबाबांचीच आठवण यावी. इतर सर्व गोष्टी विसरून जाव्यात. **संगमयुगात मला संपन्न संपूर्ण बनायचंय. इतरांची चिंता मी का करावी? ना स्वत:च्या देहात ना देहाच्या संबंधांमध्ये, कशातही मोह असता कामा नये. हा देह आणि धन ईश्वरीय सेवेत सफल होत आहे. सांभाळणारा शिवबाबा आहे.** खुश राहण्याची शक्ती मिळाली आहे. थोडासा हिशोब पूर्ण करावा लागला तर त्यात काय एव्हढं मोठं? बाबा सुप्रीम सर्जन आहे तसाच साजनही आहे, जो सांभाळतो आहे. माता, पिता, पती, सखा... सर्व संबंधांचं सुख देणारा तो प्रेमाचा सागर आहे.

**भावानुवाद : ब्र.कु. मीनल, ठाणे (प.)**

■■

## योगाचे विभिन्न मनोरंजक १६ अभ्यास

१. मी आत्मा या शरीरात अवतरित झालो आहे. मी शिवशक्ती अवतार आहे. मी या देहापासून भिन्न आहे.

२. मी आत्मा राजा भृकुटी सिंहासनावर विराजमान आहे. मी स्वराज्य अधिकारी आहे. मी देहाच्या कर्मेंद्रियांचा तसेच मन-बुद्धीचा मालक आहे.

३. मी आत्मा मास्टर पवित्रतेचा सूर्य आहे. माझ्यापासून निघालेली पवित्रतेची किरणे माझ्या संपूर्ण शरीरात पसरत आहेत.

४. मी फरिश्ता आहे. मी प्रकाशाचा ड्रेस परिधान केला आहे. मी पवित्रता व शांतीचा फरिश्ता आहे. माझ्या डोळ्यातून तसेच हातातून निघणारी किरणे विश्वात पसरत आहेत.

५. मी मास्टर सर्वशक्तिवान आहे. माझ्या अंगातून सर्वशक्तींची किरणे सर्वत्र पसरत आहेत.

६. सर्वशक्तिवान शिवबाबांची माझ्या मस्तकावर छत्रछाया आहे.

७. माझ्यासमोर सृष्टीचा ग्लोब (गोळा) आहे. मी मास्टर सर्वशक्तिवान आहे. माझ्या भृकुटीतून सर्वशक्तींची किरणे निघून त्या ग्लोबवर पडत आहेत.

८. मी पवित्रतेचा फरिश्ता आहे. कमल आसनावर स्थित आहे. प्रकृतीचा मालक आहे. शिवबाबांपासून पवित्रतेचे कारंजे माझ्यावर पडत आहे. ही पवित्रतेची किरणे माझ्यापासून निघून प्रकृतीला पावन बनवित आहेत.

९. मी शांतीचा फरिश्ता एका उंच डोंगरावर आहे. माझ्यावर बाबांची शांतीची किरणे पडत आहेत व माझ्यापासून चोहीकडे पसरत आहेत.

१०. ज्ञानसूर्य शिवबाबा माझ्या सन्मुख आहे. त्याची किरणे माझ्या चेहऱ्यावर पडत आहेत. मी मास्टर ज्ञानसूर्य आहे.

११. बाबा व मुले वतनमध्ये एका पर्वतावर आहेत. ब्रह्मा बाबांच्या भृकुटीत शिवबाबा सूर्याप्रमाणे चमकत आहेत. त्यांची किरणे माझ्यावर पडत आहेत.

१२. मी फरिश्ता सूक्ष्म वतनमध्ये आहे. बाबांनी आपला हात माझ्या मस्तकावर ठेवला आहे व मला मुखाने वरदान देत आहेत.

१३. बाबा माझा आहे, बाबा माझा परममित्र आहे... हा संबंध जोडून त्याच्याशी वार्तालाप करा.

१४. पाच स्वरूपांचा (अनादि, आदि, पूज्य, ब्राह्मण व फरिश्ता) अभ्यास दिवसातून पाच वेळा करा.

१५. जसे बाबा या विश्वाला साक्षी होऊन बघतात, तसे बघा. हे सृष्टिचक्र आता पूर्ण होत आहे. व आत्म्याला आता परत आपल्या घरी जायचे आहे.

१६. दिवसात पाच वेळा सर्वांना आत्मिक दृष्टीने पाहा. सर्वांविषयी शुभचिंतन करा. आपल्या श्रेष्ठ वृत्तीद्वारे वातावरण परिवर्तन करा.

■■

भाग - १०

# ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

**- ब्र.कु. रमेश शाह,** गावदेवी (मुंबई)

आतापर्यंत आपण यज्ञाच्या वर्तमान आणि भविष्यातील कारभाराला योग्य आणि यशस्वी बनविण्यासाठी दोन गोष्टींवर विचार केला आहे. या संदर्भात मॅनेजमेंट गुरुंच्या वतीने सांगितलेल्या तिसऱ्या गोष्टींवर आज विचार करूया.

**मॅनेजमेंट गुरूंच्या मतानुसार कार्यव्यवहारात यशासाठी आवश्यक तिसरा गुण आहे- विश्वसनीयता! म्हणजे भरवश्याचा पात्र असणे (Credibility) ज्याला साधारण भाषेत म्हणता येईल विश्वासपात्र बनणे आणि सदा विश्वासपात्र राहणे.**

यशस्वी कारभारासाठी विश्वसनीयता हा अतिशय आवश्यक असा गुण आहे कारण विश्वाच्या इतिहासात जेव्हा जेव्हा एखाद्या राज्यसत्तेचे पतन झाले आहे ते याच गुणाच्या अभावामुळे पहायला मिळाले. राजाचे जे जवळचे असे विश्वासू लोक होते, त्यांनीच राजाला दगा दिल्यामुळे युद्धात त्या राजाची शेवटी हार झाली. उदा. बंगालचा नवाब सिराजुद्दौलाचा विश्वासू सेनापती मीर जाफरला बंगालचा नवाब बनविण्याचं आमिष रॉबर्ट क्लाईव्ह याने दिले व त्याला आपल्या बाजूला वळविले. मीर सादिकने टिपू सुलतानला दगा दिला. परिणामस्वरूप टिपू सुलतान पराक्रमी असूनही युद्धात त्याचा पराभव झाला. इतिहासाच्या पानांवर असे अनेक वृत्तांत सांगितले आहेत की ज्यामुळे इतिहास घडला. इंग्रजी शब्दकोषामध्ये दोन शब्द आहेत; ते म्हणजे but आणि If. पण इतिहासाच्या कोषात त्यांना स्थान नाही. इतिहास नेहमी नवीन गोष्टींच्या, वास्तविकतेच्या आधारावर रचला जातो.

विश्वासपात्रतेच्या संदर्भात म्हणायचे झाले तर महाभारतातील श्रीकृष्ण व भीष्म यांच्यामध्ये खूप सुंदर संवाद दाखविला आहे. नऊ दिवसांपर्यंत भीष्माने युद्ध केले आणि या नऊ दिवसांत पांडवांच्या पक्षातील अनेक सैनिकांचा मृत्यू पाहून श्रीकृष्णाने (ज्यांनी शस्त्र न उचलण्याची प्रतिज्ञा केली होती त्यांनीही) शस्त्र उचलले तेव्हा भीष्म त्यांना म्हणाले की, मी माझ्या प्रतिज्ञेच्या अनुसार कुरूवंशाच्या विश्वासास पात्र बनण्याचा प्रयत्न केला. मी माझे पिता शंतनुच्या सन्मुख प्रतिज्ञा केली होती की मी सदैव कुरूवंशाची रक्षा करीन आणि त्यानुसार मी कार्य केले. श्रीकृष्ण त्यांना म्हणाले की पांडवसुद्धा कुरूवंशाचेच आहेत आणि शंतनुचे वारस आहेत. तरीसुद्धा जेव्हा लाक्षागृह जाळले, जुगार खेळला गेला आणि द्रौपदीचे वस्त्रहरण झाले तेव्हा आपण केवळ पाहातच राहिलात आणि तुम्ही पांडवांसाठी काहीच केले नाही. मग ही कोणती विश्वसनीयता आहे? प्रतिज्ञा ती असते ज्यामुळे समाजाचे भले होते परंतु तुमच्या प्रतिज्ञतेने काही चांगले झाले नाही. आपण सत्याचे स्वरूप ओळखले परंतु धर्माचे स्वरूप नाही ओळखले. मग श्रीकृष्णाने एक खूप गुह्य असे सनातन सत्य त्यांना सांगितले. ते म्हणाले की, जर तुमची विश्वसनीयता समग्र कुरूवंशाप्रती असती (न केवळ हस्तिनापूर सम्राटाप्रती) तर जेव्हा मी संधी प्रस्ताव घेऊन आलो होतो तेव्हा आपण तो स्वीकार करू शकला असता; पण आपण खोट्या विश्वसनीयतेच्या आधारावर गप्प बसलात आणि त्याचमुळे हे कुरूक्षेत्राचे युद्ध होत आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात मानवसंहाराचे एकमात्र कारण म्हणजे हस्तिनापूरच्या राजसत्तेप्रती असलेली आपली खोटी विश्वसनीयता! एवढा मोठा नरसंहार आपली एक चुकीची मान्यता-प्रतिज्ञा-समज यामुळे झाला. तेव्हा भीष्म यांनी श्रीकृष्णाला विचारले की मी आता काय करू? तेव्हा



**महाभारतातील श्रीकृष्ण व भीष्म यांच्यामध्ये खूप सुंदर संवाद दाखविला आहे. नऊ दिवसांपर्यंत भीष्माने युद्ध केले आणि या नऊ दिवसांत पांडवांच्या पक्षातील अनेक सैनिकांचा मृत्यू पाहून श्रीकृष्णाने शस्त्र उचलले तेव्हा भीष्म त्यांना म्हणाले की, मी माझ्या प्रतिज्ञेच्या अनुसार कुरूवंशाच्या विश्वासास पात्र बनण्याचा प्रयत्न केला.**

श्रीकृष्णाने सांगितले की, शस्त्राचा त्याग करा आणि मृत्यूची प्रतीक्षा करा. त्या अनुसार भीष्माने शस्त्रत्याग केला व ते शरशय्येवर झोपले. भीष्म यांनी शस्त्रत्याग केल्यानंतर पांडवांचा विजय झाला. मी ही गोष्ट अशा संदर्भात लिहित आहे. जेणेकरून विश्वसनीयतेच्या गुण व अवगुणामध्ये किती अंतर आहे हे लक्षात येईल.

जसे दुनियेतही विश्वसनीयतेच्या आधारे कार्य करणे अपेक्षित असते. तसेच 'परमात्म्याच्या' या श्रेष्ठ दैवी कार्यातही विश्वसनीयतेचा गुण आवश्यक आहे. एकदा मी शिवबाबांना म्हटले की ''बाबा तुम्ही आमची इतकी का परीक्षा घेता? दुनियेतील कोणताही बाप आपल्या मुलांची अशी परीक्षा घेत नसेल आणि आपण तर परमपिता परमात्मा आहात म्हणून आम्हाला तुम्ही मदत केली पाहिजे परंतु तुम्ही तर परीक्षा घेत आहात, असे का?'' उत्तरादाखल बाबा म्हणाले की ''तुम्ही जेव्हा बाजारात एखादे दोन आण्याचे मडके खरेदी करायला जाता तेव्हा व्यवस्थित पारखूनच घेता ना! त्याला कुठे छिद्र तर नाही ना ते तपासून पाहता. मी आपल्या मुलांना २५०० वर्षांसाठी राज्यभाग्य देतो ते न तपासता वा न पारखता असेच थोडे देणार! मुलांना योग्य बनविण्यासाठी मला त्यांची वेळोवेळी परीक्षा घ्यावी लागते. जेव्हा तुम्ही मुले योग्य बनता तेव्हा तुमच्या हाती २५०० वर्षांसाठी राज्यकारभार निश्चिंतपणे सोपवून मी परमधाममध्ये निघून जातो म्हणजे विश्वासपात्र मुलांच्या हाती भविष्याची ठेव सोपवितो. त्यावर मी बाबांना म्हटले की ''बाबा, जे कुणी धर्मसंस्थापक येऊन गेले; त्यांनी आपल्या अनुयायींची विश्वसनीयतेच्या बाबतीत इतकी परीक्षा घेतली नाही जेवढी तुम्ही आम्हा मुलांची घेत असता. तेव्हा बाबा म्हणाले की, बच्चे त्यांच्या आणि माझ्या कारभारामध्ये हाच मोठा फरक आहे की धर्मस्थापक द्वापरयुगात येतात. त्या समयापासून त्या आत्म्यांची स्थिती रजोप्रधान असते आणि त्यांच्या धर्माचा प्रचार-प्रसार करणारे आणि त्याचे रक्षण करणारे आत्मेसुद्धा आपल्या रजोप्रधान अवस्थेत असतात; पण मी तर जन्म-मरण रहित आहे. मी जेव्हा येतो तेव्हा आपल्या मुलांच्या समोरच येतो आणि त्यावेळी तुम्ही मुले पूर्ण तमोप्रधान झालेले असता; तेव्हा अशा तमोप्रधान मुलांना पूर्णपणे सतोप्रधान बनवून, नवीन विश्वाचा २५०० वर्षांपर्यंतचा कारभार सोपवितो. ते धर्मस्थापक स्वतःहून समाजासमोर येऊन कार्य करतात तर मी आपल्या मुलांसमोरच येतो. अशा प्रकारे विश्वसनीयतेसाठी योग्य व्यक्तीची निवड करणे जरूरी असते. आणि व्यक्तीला विश्वासपात्र बनविण्यासाठी आणि त्याची योग्यता पारखण्यासाठी परीक्षा तर घ्यावीच लागते. म्हणून मी मुलांची एवढी परीक्षा घेतो.

पिताश्री ब्रह्माबाबांनी मातेश्वरीशी पहिल्या दिवशीच केलेल्या वार्तालापात त्यांची परीक्षा घेतली व त्यांना विश्वसेवेसाठी निमित्त बनविले. आपण आजही मातेश्वरींजीचे गायन करीत आहोत. मातेश्वरीजीने पहिल्या मुलाखतीमध्येच शिवबाबांचा विश्वास संपादन केला.

मातेश्वरीर्जीनी आपल्या पार्थिव शरीराचा त्याग केला त्यानंतर काही महिन्यांनी दि. १ एप्रिल १९६६ रोजी लिथोद्वारा बनविलेल्या मुरलीच्या शेवटच्या अर्ध्या पानावर ब्रह्माबाबांनी आदरणीय प्रकाशमणीजी व आदरणीय दादी मनमोहिनीजी यांची नियुक्ती केली; कारण त्यावेळी दादी प्रकाशमणीजी यांना यज्ञामध्ये ३/४ मम्मा म्हटले जाई तसेच यज्ञाच्या संचालनाच्या कारभारात ब्रह्माबाबांबरोबर दादी मनमोहिनीजी सुद्धा खूप अनुभवी झाल्या होत्या. त्या दोघींनी ब्रह्माबाबांचा पूर्ण विश्वास प्राप्त केला होता म्हणून जेव्हा ब्रह्माबाबांनी १८ जानेवारी १९६९ रोजी साकार शरीर सोडले, त्यापूर्वी दादी प्रकाशमणीर्जींच्या हातात हात देऊन, सर्व शक्ती त्यांना सोपविल्या. म्हणजेच बाबांनी आपल्या विश्वासपात्र वत्सांच्या हाती कारभार सोपवून



**एकदा मी शिवबाबांना म्हटले की ''बाबा तुम्ही आमची इतकी का परीक्षा घेता? दुनियेतील कोणताही बाप आपल्या मुलांची अशी परीक्षा घेत नसेल आणि आपण तर परमपिता परमात्मा आहात म्हणून आम्हाला तुम्ही मदत केली पाहिजे परंतु तुम्ही तर परीक्षा घेत आहात, असे का?''**

निश्चिंत झाले. दोघीही ब्रह्माबाबांच्या विश्वासाला खऱ्या उतरल्या. दादी प्रकाशमणीजी यांनी १९६९ ते २००७ पर्यंत यज्ञाचा कारभार यशस्वी रित्या करून विश्वसनीयतेचा पुरावा दिला.

शास्त्रामध्ये म्हटले की ''राजा कालस्यकारणम् वा कालः राजस्यकारणम्'' म्हणजे राजाच्या आधारावरच काळाचे निर्माण होते म्हणूनच राजपदाचे अधिकारी नेहमीच योग्य असायला हवेत, ज्यामुळे ते आपल्या गुणांच्या आधारे श्रेष्ठ समाजाची स्थापना करू शकतील. जेथे राजे श्रेष्ठ कारभार करण्यात असफल झाले तेथे त्यांच्या अवगुणामुळे समाजाचे खूप नुकसान झाले आहे. अशा राजांबद्दलही संस्कृतमध्ये श्लोक आहे. ''राजा नश्यति दर्पेण ब्राह्मणों राजसेवया। गावो पूर-प्रचारेण हिरण्य लोभलिप्सया।'' याचा सोप्या भाषेत असा अर्थ आहे की अति अभिमानाने राजे नष्ट होतात. ब्राह्मण आपली जन्मजात सेवा सोडून राजांची सेवा करायला जातात गाई दूर-दूर पर्यंत चालल्या जातात आणि धनसंपत्तीचे मालक लोभामुळे नष्ट होतात. तात्पर्य म्हणजे विश्वसनीयतेला नव्या विश्व कारभारामध्ये खूपच महत्त्वाचे स्थान आहे.

यज्ञात जेव्हा ज्ञानसरोवरचे निर्माण कार्य झाले तेव्हा दादीजींने प्रत्येक विभागात योग्यतेनुसार विश्वासपात्र व्यक्तींना निमित्त बनविले. दादीजी त्यांना वेळोवेळी त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देत असत. अशाच प्रकारे जेव्हा शांतिवन बनत होते तेव्हा दादीजी दोन महिने रोज पांडवभवनहून शांतिवनला येत असत आणि सर्व कारभारावर लक्ष देत असत. तेथील विभागांसाठी सुद्धा त्यांनी योग्य व्यक्तींना निमित्त बनवून त्यांना जबाबदारीची जाणीव दिली. परिणामस्वरूप जे कोणी निमित्त बनलेले आहेत, त्यांनी आपली जबाबदारी खूप उत्तमरित्या सांभाळली आहे.

लहान-सहान गोष्टी तर परीक्षेच्या रूपामध्ये येणारच परंतु अशा काही परीक्षा येतात की त्यावेळी अव्यक्त बापदादा आणि दादींनी आमच्यावर विश्वास वा भरोसा ठेवला आहे. अव्यक्त बापदादांच्या विश्वासाच्या पात्र बनणे हे फार मोठे आव्हान आहे कारण अनेक वेळा आम्ही मायेच्या वशीभूत होऊन अपयशी ठरतो तेव्हा त्याच्या परिणामस्वरूप आम्ही साधारण प्रजा; वा सावकार पदाचे अधिकारी बनतो. पण राजा किंवा राजपदातील सदस्य बनण्याच्या निवडीसाठी सफल होणे फार मोठे आव्हान आहे आणि या निवडीमध्ये आपण सर्व यशस्वी व्हावे अशी माझी शुभकामना आहे. विश्वासपात्रतेच्या बाबत आणखी एक गोष्ट आवश्यक आहे की अनेकदा दैवी परिवाराच्या भाऊबहिणींचा असा व्यवहार पाहून प्रश्न पडतो की काय बाबांची मुले अशी कर्मे करू शकतात? परंतु बाबा म्हणतात, 'मुलांनो सत्ययुगी राजधानी आता स्थापन होत असल्याने, सर्व आत्मे आपापल्या पुरुषार्थाच्या आधारावर आपले पद निर्धारित करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रति घृणाभाव ठेवू नका. सत्ययुगातही सर्व प्रकारच्या लोकांची म्हणजे चंडाळ आदी कनिष्ट पद असलेल्यांची सुद्धा आवश्यकता असेल आणि ते सर्व दैवी परिवारामधूनच येणार. बाबा सांगतात की बच्चे तुम्ही सर्वांशी प्रेमाने व्यवहार करा कारण एक वैशिष्ट्य या भाऊबहिणींचे आहे आणि ते म्हणजे त्यांनी परमात्म्याला ओळखले आहे परंतु ते परमात्म्याच्या विश्वासाचे पात्र न बनता मायेचे विश्वासपात्र बनले.'

**म्हणून दैवी परिवाराच्या सर्व भाऊबहिणींना माझी नम्र विनंती आहे की परमात्म्याचे विश्वासपात्र बनून, त्यांचे उजवे हात बनून श्रेष्ठ पदाचा अधिकार प्राप्त करणे हे आपले ध्येय असले पाहिजे. या लेखाचे घोषवाक्य (स्लोगन) आहे. परमात्म्याचे विश्वासपात्र अर्थात राईट हॅण्ड बना आणि सर्वांना असे बनवा.**

**(भावानुवाद बी.के. जयश्री बहेन, विक्रोळी, मुंबई)**

■■



**अति अभिमानाने राजे नष्ट होतात. ब्राह्मण आपली जन्मजात सेवा सोडून राजांची सेवा करायला जातात गाई दूर-दूर पर्यंत चालल्या जातात आणि धनसंपत्तीचे मालक लोभामुळे नष्ट होतात. तात्पर्य म्हणजे विश्वसनीयतेला नव्या विश्व कारभारामध्ये खूपच महत्त्वाचे स्थान आहे.**

# त्याग, तपस्या व सेवामूर्त ओमप्रकाश भाईजी

साकार मातपिता व दादींजींची पालना प्राप्त झालेले, इंदौर झोनचे डायरेक्टर भ्राता ओमप्रकाशजी, ज्यांना सर्व जण मोठ्या प्रेमाने 'भाईजी' असे संबोधित असत; त्यांनी ईश्वरी सेवा करून मध्यप्रदेश, छत्तीसगड व त्या लगतच्या राज्यात सुमारे ४०० सेवाकेंद्रे, उपसेवाकेंद्रे स्थापित केली. इंदौर येथे कन्यांसाठी विशेष 'दिव्य कन्या छात्रालय' स्थापन केले, जेथे आतापर्यंत शेकडो कन्यांनी ज्ञान–योगाच्या पालनेबरोबर लौकिक शिक्षणही प्राप्त केले. त्यातील अनेक कन्या समर्पित झाल्या व आज आदर्श ब्रह्मकुमारी टीचर बनून अनेक सेवाकेंद्रावर ईश्वरी सेवा करीत आहे. विशेष बाब म्हणजे अशा प्रकारचे दिव्य कन्या छात्रालय हे भारतात एकमेव व अद्वितीय असे आहे. त्यामुळे भ्राता ओमप्रकाश भाईजींचे हे कार्य महान व प्रशंसनीय असे आहे.

भ्राता ओमप्रकाश यांना त्यांच्या वयाच्या २२ व्या वर्षी, सन १९५७ मध्ये अम्बाला येथे ईश्वरी ज्ञान प्राप्त झाले. त्यानंतर पटियाला येथे त्यांनी इंजिनियरींगचे शिक्षण घेतांना आपल्या त्यागमूर्त व आदर्श जीवनाची छाप तेथील विद्यार्थ्यांवर टाकली. त्यावेळी ब्र.कु. आत्मप्रकाशभाई (ज्ञानामृत प्रेस, आबू) हे त्यांचे सहपाठी होते. त्यांना देखील ईश्वरी ज्ञान देऊन आपला साथी बनविले. त्यानंतर ते दोघेही ईश्वरी सेवेत समर्पित झाले. सुरुवातीला ओमप्रकाश भाईजींनी पंजाब, हरियाणामध्ये सेवा केली. नंतर बापदादांच्या प्रेरणा अनुसार मध्यप्रदेश मधील जबलपूर व इंदौरमध्ये सेवेचा विस्तार केला. **१३ जानेवारी १९६९ रोजी पिताश्री ब्रह्मबाबांनी ओमप्रकाश भाईंना पत्र पाठवले होते व इंदौर येथे सेवेसाठी जाण्याचा निर्देश दिला होता. त्यानुसार २३ फेब्रुवारी १९६९ रोजी त्यांनी इंदौर येथील गांधी हॉलमध्ये आध्यात्मिक प्रदर्शनीद्वारे सेवेची सुरुवात केली होती. आज इंदौर झोनमध्ये सुमारे ६०० सेवाकेंद्रे व उपसेवाकेंद्रे आहेत.**

सन १९८० मध्ये तत्कालिन मुख्य प्रशासिका दादी प्रकाशमणीजी यांच्या निर्देशानुसार इंदौर मधील न्यू पलासिया या मध्यवर्ती भागात ओमप्रकाश भाईंनी जमीन खरेदी करून तेथे 'ओमशांती भवन' चे निर्माण कार्य केले व तेथे ५५० मूर्तींनी सुशोभित 'सृष्टी दर्शन आध्यात्मिक संग्रहालय' स्थापित केले; ज्याचा लाभ आजवर लाखो आत्म्यांनी घेतला आहे. ओम शांती भवनला लागूनच एक विशाल भवन 'ज्ञान शिखर' बांधण्यात आले, जेथे उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी निवास करतात. त्याच्याच एका हॉलमध्ये अनेक सामाजिक आध्यात्मिक व विभिन्न वर्गांसाठी संमेलन व शिबीर आयोजित केले जातात. **अशाप्रकारे सन १९६९ मध्ये ओमप्रकाश भाईंनी जे परमात्म ज्ञानाचे बीजारोपण केले त्याचा विस्तार आता मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओरिसा व राजस्थान या चार राज्यात झाला आहे. केवढे हे थोर महान कार्य! त्यामुळे ''चंदनाचे खोड लाजे, हा झिजे त्याहूनही'' अशी त्याची महिमा आहे.**



भ्राता ओमप्रकाश हे ईश्वरी सेवेच्या नवीन-नवीन योजना तयार करून लगेचच त्या कार्यान्वित करणारे होते. ते मीडिया विंगचे अध्यक्ष, कुशल वक्ता व लेखक होते. ते पवित्रतेच्या व योगाच्या बळावर हजारो आत्म्यांचे जीवन श्रेष्ठ बनविण्यासाठी निमित्त बनले. **त्यांना सन २००४ मध्ये युनोद्वारे संयुक्त राष्ट्र दिवसाच्या शुभ मुहूर्तावर ''इंटरनॅशनल अवार्ड इन मीडिया फॉर स्प्रीरिचुअल्टी'' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.** आध्यात्मिक क्रांतिचे दूत असलेल्या ओमप्रकाश भाईंनी सन १९९१ मध्ये केनिया, इंग्लंड, स्कॉटलॅण्ड इत्यादी देशात यात्रा करून लाखो आत्म्यांना प्रेरित केले होते.

अशा या महान त्यागी, तपस्वी व सेवाधारी आदरणीय भ्राता ओमप्रकाश भाईजी यांनी दि. २४ डिसेंबर २०१५ रोजी (वयाच्या ७९ वर्षी) आपल्या नश्वर देहाचा त्याग केला व ते अव्यक्त वतनवासी झाले. (त्यांना मागील ६ महिन्यांपासून लीव्हरचा त्रास होत होता) **त्यांच्या पावन स्मृतीला आम्हा सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी–कोटी प्रणाम!**

# जो सदा साक्षी स्थितीत राही, तोचि आनंद स्वरूप होई



- ब्र.कु. गोदावरी दीदी, मुलुंड (मुंबई)

मानव जीवनाचे लक्ष्य आनंदाची प्राप्ती हेच आहे ज्यासाठी तो निरंतर प्रयत्नशील आहे. परंतु आनंदाच्या प्राप्तीसाठी रात्रंदिवस जीवापाड मेहनत करीत राहिल्याने, आज तो दुःखी व अशांत बनला आहे. याला मुख्य कारण म्हणजे मानवाचा आपल्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भ्रामक व चुकीचा आहे. जसे एखादे तहानलेले हरीण दूरवर दिसणाऱ्या मृगजळाला भुलून त्याच्या प्राप्तीसाठी धावत राहते, तशी माणसांची गत झाली आहे. तो जितका आनंदप्राप्तीसाठी धावतो आहे तितका अधिक दुःखाचा अनुभव करीत आहे. त्यामुळे त्याला शांतपणे विचार करण्याची आवश्यकता आहे की आपण ज्या मार्गाने रात्रंदिवस धावतो आहोत, तो बरोबर आहे का? खरं तर आज मनुष्याचा जीवनाविषयीचा दृष्टिकोनच चुकीचा आहे.

## साक्षी भाव असेल तर सृष्टिचक्र आनंददायी

सृष्टी एक विराट रंगमंच आहे, जेथे विविधतापूर्ण मनोरंजक नाटक अविरत चालू आहे. नाटकाचा आनंद लुटण्यासाठी साक्षी भाव अति आवश्यक आहे. याउलट जेव्हा आपण त्या नाटकाशी तादात्म्य पावतो वा आसक्त होतो तेव्हा ते नाटक दुःखदायी संसार बनते व साक्षी भाव असेल तर ते आनंददायी नाटक बनते. याला मूलतः कारण आपला दृष्टिकोन आहे. जसे एखाद्याला काविळ झाली तर त्याला सगळेच पिवळे दिसू लागते. आपण डोळ्यावर जो चष्मा लावू तसे जग दिसते. उदा. लाल चष्मा लावला तर सगळं लाल दिसते. **तात्पर्य म्हणजे तादात्म्य वा आसक्तिची मनोवृत्ती असणाऱ्याला हा संसार दुःखदायक व मायाजाळ वाटतो याउलट ज्याची मनोवृत्ती अनासक्त वा साक्षी आहे त्याला आनंददायक नाटक वाटते. त्यामुळे परिस्थिती बदलण्याच्या मागे न लागता आपली मनोवृत्ती बदलण्याचा पुरुषार्थ केला पाहिजे. साक्षी स्थितीत राहणाऱ्या माणसासाठी हा संसार एक आनंद प्रदायक नाटक बनून जाते. तो या नाटकातील अनेकानेक आत्म्यांचे भिन्न-भिन्न पार्ट पाहून सदैव हर्षित राहतो.** त्यामुळे त्याला मनोरंजनासाठी कुठल्या नाटकशाळेत अथवा सिनेमा हॉलमध्ये जायची गरज पडत नाही. त्याच्या समोर सदा सर्वदा मनोरंजक नाटक चालू असते. शत्रु-मित्र, स्वजन परिजन यांचे विभिन्न खेळ पाहून तो सदैव हलका व प्रफुल्लित राहतो.

## नाटकातील भूमिका व सत्य स्वरूपाची जाणीव

नाटकातील प्रत्येक कलाकाराला सदैव ही जाणीव असते की मी जी भूमिका करीत आहे, त्यापासून मी भिन्न आहे. परिणाम स्वरूप सुख-दुःखाच्या नाटकात तो अनासक्त राहून केवळ आपल्या अभिनयाचा आनंद घेत असतो. वस्तुतः आपण सर्वजण या सृष्टी-नाटकातील कलाकार असून, आपले घर परमधाम वा शांतीधाम आहे. तसेच आपले अनादि स्वरूप ज्योतिबिंदू स्वरूप आहे. या सृष्टी नाटकात आपण शरीर धारण करून हे विविधतापूर्ण मनोरंजक नाटक करीत आहोत, परमात्म शिव पिता सुद्धा या सृष्टी-नाटकाचा आनंद घेण्यासाठी आले आहेत, परंतु परमात्मा सदा साक्षी होऊन या सृष्टीच्या उत्थान व पतनाचा खेळ पाहतात. त्यामुळे सदा आनंदाचे सागर आहेत.

## सृष्टिनाटकाच्या स्मृतीने साक्षी भाव येतो

संगमयुगात ज्ञानसागर शिवबाबांनी आपल्याला सृष्टीच्या आदि-मध्य अंताचे यथार्थ ज्ञान दिले आहे. सत्ययुग व त्रेतायुगात मनुष्यात्मे सदा आत्मअभिमानी असल्याने, सदा सुखी असतात. त्यांच्यात स्वाभाविकरित्या साक्षी भाव असतो. परंतु **द्वापारयुग व कलियुगात देहअभिमानामुळे मनुष्याला साक्षीभावाचा विसर पडतो. परिणामतः तो लहान-मोठ्या गोष्टीत 'का', 'कसे', 'काय'... असे अनेक प्रश्न उपस्थित करतो. फलस्वरूप स्वतःच दुःखी व अशांत बनतो.**

**म्हणूनच दुःखहर्ता, सुखकर्ता परमात्मा पिता, कलियुगाचे अंती अनादि, निश्चित सृष्टि-नाटकाच्या आदि-मध्य-अंताचे ज्ञान देऊन आपल्याला पुन्हा पूर्णतः साक्षी बनवित आहेत. अशाप्रकारे सृष्टि- नाटकाला साक्षी होऊन पाहणाराच खरा योगी आहे.**

**या सृष्टि-नाटकात आपण शत्रु-मित्र, पिता-पुत्र, पति-पत्नी अथवा अन्य कुठलाही अभिनय करू शकतो. परंतु आत्मरूपात आपण सर्व निराकार परमपिता शिव परमात्म्याची मुले असल्याने भाऊ-भाऊ आहोत. या मूळ संबंधावर आपल्या सृष्टि-नाटकातील भूमिकेचा कुठलाही प्रभाव पडता कामा नये. हाच जीवनाचा यथार्थ दृष्टिकोन आहे. परंतु याचाच मनुष्याला विसर पडल्याने, मानव जीवन कटूतापूर्ण व दुःखदायी बनले आहे.**

## साक्षी अवस्था हीच शांतीची जननी

साक्षी भाव असणारा मनुष्य सदा निश्चिंत, हलका व हर्षितमुख राहतो. याउलट आसक्तीपूर्ण मनुष्याचे जीवन सदा चिंतित, असंतुष्ट व तणावग्रस्त असते. म्हणूनच जीवनात सदा साक्षी अवस्था जरुरीची आहे. कारण त्यामुळेच आपण 'शांती' स्वधर्मात टिकू शकतो. म्हणून साक्षी अवस्था ही शांतीची जननी आहे. साक्षी भाव असणारी व्यक्ती कुठल्याही कठीण परिस्थितीत विचलित होत नाही. परंतु त्या कठीण परिस्थितीला या सृष्टि-नाटकाचा एक भाग समजून, सदैव अचलअडोल राहते... समजा, कोणी अपमान केला व त्यावेळी जर आपण त्या गोष्टींकडे साक्षी होऊन पाहिले तर ते बोल आपल्या मनाला स्पर्शाही करणार नाहीत. कारणआपण जाणतो की ती व्यक्ती अज्ञानवश उलटे कर्म करीत आहे कर्मसिद्धांतानुसार ज्याचा परिणाम त्याला भोगावा लागेल परंतु मूळ आत्मिक संबंधानुसार तो आपला भाऊ असल्याने, त्याच्याविषयी मनात क्रोधाऐवजी करुणा उत्पन्न होईल. फलस्वरूप मान-अपमान, निंदा-स्तुती, सुख-दुःख यापासून सदा उपराम राहून सदा आनंदाचा अनुभव करू. वास्तविक आपल्या जीवनात येणारे कठीण प्रसंग हे आपल्या कमजोर मनोवृत्तीचे सूचक आहेत, जर आपली मनोवृत्ती यथार्थ वा योग्य असेल तर पर्वताएवढी समस्यासुद्धा आपल्याला राईसारखी वाटेल. वास्तविक आपल्या जीवनात येणारी कठीण परिस्थिती ही आपल्याला सहनशीलता, निर्भयता व हर्षितमुखतेचा पाठ पक्का करविण्यासाठी येत असते. **त्यामुळे कठीण परिस्थितींचा सहर्ष स्वीकार करा म्हणजे आपण अष्ट शक्ती संपन्न व सर्वगुणसंपन्न बनू. याउलट जो कठीण परिस्थितीला घाबरून पळ काढतो, तो सदा काळासाठी निर्बल बनतो.** साक्षी दृष्टीवाला मनुष्य कठीण परिस्थितीचे सदैव स्वागत करतो व आपल्या मार्गातील उंच शिखरांना, स्वर्गात जाण्याची शिडी बनवतो. आपल्या जीवनातील वादळांना दिव्यगुणांचे वरदान देणारा समजतो. फलस्वरूप त्याचे जीवन हिरेतुल्य बनत जाते. त्याचबरोबर परमात्मा पिता जसा सदा साक्षी असल्याने आनंदाचा सागर आहे तसा साक्षी स्थितीत राहणारा मास्टर आनंदाचा सागर बनतो आणि नित्य नूतन, मनोरंजक, आनंददायी अशा सृष्टी-नाटकाचा मनमुराद आनंद लुटतो. या अनुषंगाने ज्ञानसागर परमात्मा शिव पित्याचे पुढील महावाक्य सदैव लक्षात ठेवा, **''मीठे बच्चे, साक्षीपन की सीटपर सेट होकर, वैरायटी ड्रामा की स्मृति रखते हुए अगर एक-एक पार्टधारी का हर पार्ट देखो, तो सदैव हर्षित रहेंगे। साक्षीवन की मुख्य निशानी है कि वह सदैव हर कदम, हर संकल्प में बापदादा को सदा साथी अनुभव करेगा और बापदादा को सब बातों में फॉलो करने का सबूत देगा।''**

यावरून आपल्या लक्षात आले असेल की साक्षी स्थिती अलौकिक ब्राह्मण जीवनातील सर्वश्रेष्ठ स्थिती आहे. ती बनविण्यासाठी शिवबाबांनी आपल्याला यथार्थ ज्ञान तसेच त्यासाठी आवश्यक पुरुषार्थ देखील सांगितला आहे. वास्तविक विश्व-नाटकाचे यथार्थ ज्ञान हाच साक्षी स्थितीचा एकमात्र आधार आहे. जसे एखाद्या कमजोर व्यक्तीला शक्ती यावी म्हणून ग्लुकोज चढवले जाते तसेच आपण जेव्हा स्वतःला शरीरापासून भिन्न अशरीरी आत्मा समजतो तेव्हा ही साक्षीपनची अवस्था शक्ती भरण्याचे कार्य करते. **जितका वेळ आपण साक्षी स्थितीत राहतो. तितकाच वेळ आपल्याला साथी शिवबाबांची स्मृती असते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जितके आपण साक्षी स्थितीत राहू तितकेच आपण साक्षात्कारमूर्त व साक्षात मूर्त बनू. चला तर मग अशी श्रेष्ठतम साक्षी स्थिती बनविण्याचा दृढ संकल्प करू या.**

■■

# वाचकांशी हितगुज

**१. अमृतकुंभ व अमृतकलश या दोन्ही द्वैमासिकांचा विचार करता सन २०१६-१७ हे मराठी द्वैमासिकाचे ३२ वे वर्ष आहे. आजवर वाचक वर्गाने जो उदंड प्रतिसाद दिला, त्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार! यापुढेही तो असाच वाढत राहील, अशी खात्री आहे. 'अमृतकुंभ' द्वैमासिक खऱ्या अर्थी ईश्वरी ज्ञान अमृताचा कुंभ आहे. तो घरोघरी पोचविणे हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे.**

२. वाचकांनी/सेवाकेंद्रांनी एप्रिल २०१६ पासून सुरु होणाऱ्या नवीन वर्षाची मागणी फेब्रुवारी २०१६ अखेरपर्यंत कळवावी म्हणजे, त्यानुसार अंक छापणे सुकर होईल तसेच प्रत्येकाने सभासद संख्या वाढविण्याचे लक्ष्य आपल्यापुढे ठेवावे व ईश्वरी सेवेत वृद्धी करावी. **मुख्य म्हणजे वाढत्या महागाईमुळे २०१६–१७ ची वार्षिक वर्गणी वाढविण्यात आली आहे. ती रु. ६५/– इतकी असेल. आजीव सभासद वर्गणी रु. १३००/- इतकीच असेल.**

३. अमृतकुंभच्या ई–मॅगझिन या संकल्पनेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या संकल्पनेची माहिती आपल्या मित्र परिवाराला अवश्य देत जावी. त्यांना www.amrutkumbh.com या संकेत स्थळाला (वेबसाईट) भेट देण्यास सांगावे.त्याची वार्षिक वर्गणी रु.२५ व आजीव सभासद वर्गणी रु.५०० इतकी आहे.

४. आपले विशेष अनुभव, लेख, कविता इ. साहित्य तसेच अमृतकुंभाविषयी काही विधायक सूचना असल्यास त्या अवश्य कळवाव्यात

**– प्रकाशक अमृतकुंभ**

# होळीचा वास्तविक अर्थ



होळीचा उत्सव भारतात दरवर्षी फाल्गुन पौर्णिमेला मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. (यावर्षी तो २३ मार्च २०१६ रोजी आहे.) त्यात प्रामुख्याने चार गोष्टी केल्या जातात. त्यामागील वास्तविक रहस्य पुढील प्रमाणे आहे.

**१. होलिका दहन करतात. याचा अर्थ आहे आपल्या हातून झालेले वाईट कर्म व वाईट विचार यांना योगाग्नित स्वाहा कारणे**

**२. एक दुसऱ्याला रंग लावतात अर्थात आपसातील स्वभाव-संस्काराचे मीलन करण्याची प्रेरणा देतात.**

**३. मंगल मीलन करतात. यातून ही प्रेरणा प्राप्त होते की आपल्यातील ईर्ष्या–द्वेष इत्यादी नष्ट केले पाहिजेत.**

**४. कित्येक जण श्रीकृष्णाला झोक्यावर झुलवतात. याचा वास्तविक अर्थ असा आहे की आपण देखील श्रीकृष्णाप्रमाणे अतींद्रिय सुखाच्या झोपाळ्यावर झुलले पाहिजे.**

**त्याचबरोबर होळी (होली) हा शब्द देखिल फारच अर्थपूर्ण आहे. १) इंग्रजीत होली (Holy) या शब्दाचा अर्थ आहे पवित्र अर्थात आपले संकल्प -बोल-कर्म-पवित्र बनविणे. २) हिंदीत 'होली' अर्थात जे होऊन गेले, त्याची चिंता करु नका. पुढे मात्र योगयुक्त होऊन कर्म करा. ३) होली अर्थात 'हो गई' मी आत्मा आता ईश्वर अर्पण झालो आहे. त्यामुळे माझे प्रत्येक कर्म ईश्वरी मतानुसार झाले पाहिजे. अशी ही खऱ्या अर्थाने होळी साजरी करूया.**

# सचित्र सेवावृत्त



**पेरनोली (आजरा) :** येथील मुख्य चौकात सृष्टिचक्राच्या फलकाचे उद्घाटन केल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र.कु. दत्तात्रय भाई (शांतिवन) ब्र.कु. संध्या दीदी, राजश्री व धनश्री बहेन



**सी.बी.डी. बेलापूर (नवी मुंबई) :** टी.व्ही. कलाकार ईशा सिंग यांना ईश्वरी संदेश दिल्यानंतर साहित्य भेट करतांना ब्र.कु. शीला दीदी व मीरा बहेन



**संगमनेर :** विकलांग बांधवांना सायकल प्रदान केल्यानंतर, विकलांग संघटनेचे अध्यक्ष भ्राता किशोर नावदर, ब्र.कु. भारती बहेन व ब्र.कु.पद्मा बहेन



**पाचोरा:** एस.बी. संगवी हायस्कूलमध्ये प्रवचन करतांना ब्र.कु. मीरा बहेन, शेजारी ब्र.कु. नंदा बहेन व शाळेचे चेअरमन भ्राता प्रफुल्लभाई जैन



**शिरुर :** किसान सशक्तीकरण अभियानाला शुभेच्छा देतांना गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी, नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक तसेच ब्र.कु. अर्चना, विजया व प्रिती बहेन



**पुसेगाव (खटाव) :** निरामय हॉस्पिटल पुसेगाव येथे आयोजित कार्यक्रमात बोलतांना ब्र.कु. उज्वला बहेन व डॉ. श्री. गायकवाड.



**वारणा (कोडोली)** : ग्रामविकास अभियान कार्यक्रमात माजी मंत्री विनय कोरे साहेब यांना ईश्वरी संदेश दिल्यानंतर, भेटवस्तू देतांना ब्र.कु. डॉ. वैशाली बहेन, ब्र.कु. शमा बहेन, सरपंच, उपसरपंच व अन्य



**सोनगढ** : येथील 'निसर्ग थेरपी सेंटर' चे उद्घाटन करतांना ब्र.कु. सुभद्रा बहेन, शेजारी सुप्रसिद्ध व्यापारी भ्राता दिलीपभाई चौधरी



**मांजरी (पुणे)** : वसंतदादा शुगर संस्थेचे महासंचालक श्री शिवाजीराव देशमुख यांना दादी जानकीजींच्या शताब्दी महोत्सवाचे निमंत्रण देतांना ब्र.कु. रेश्मा बहेन (हडपसर)




**वणी (चंद्रपूर)** : वाहतूक सुरक्षा सप्ताह या कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना ब्र.कु. कुंदा बहेन, मुख्य वाहतूक निमंत्रक श्री. मिश्रा, श्रीमती लता मुल्येवार व अन्य



**गाळन (पाचोरा)** : येथे आयोजित आध्यात्मिक कार्यक्रमात मा. श्रीगुमानसिंग भाऊ यांचे स्वागत करतांना, ब्र.कु. वर्षा बहेन व ब्र.कु. नंदा बहेन, शेजारी श्री अण्णाभाऊ.



**वाशी (नवी मुंबई)** : महापौर श्री. सुधाकर साबळे यांना ईश्वरी साहित्य दिल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र.कु. शीला दीदी, नगरसेविका नेत्रा शिर्के व अन्य मान्यवर

### दादीजींच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने

# प्रभुशृंगार - दादी जानकीजी

**ब्र.कु. भगवान भाई, शांतिवन,** आबूरोड

**आदरणीय दादी जानकीजी परमपिता शिव परमात्म्याचा तसेच मधुबनचा विशेष शृंगार आहेत. त्यांनी केवळ आत्म्यांना ज्ञान सांगितलं नाही तर त्यांना परमात्म स्नेही बनवलं. ही विशेष सेवा त्यांनी केली. त्यामुळे त्या खऱ्या अर्थी प्रभुशृंगार आहेत. त्यांनी आपल्या श्रेष्ठ कर्माद्वारे अनेकांच्या कर्माची रेषा बदलली.** फलस्वरूप त्या जेथे-जेथे गेल्या तेथे त्यांनी अनेकांच्या सद्भाग्याची रेषा अंकित केली. त्या सदैव सुखसागर शिवबाबांच्या सर्व प्राप्तीच्या सागरात स्वतः तर पोहत होत्याच परंतु त्यांनी अनेकांना त्या सागरात पोहायला शिकवलं. त्यांच्या श्वासोश्वासात प्रभु याद व सेवा समावलेली आहे **अशा प्रभुशृंगार दादीजींना १ जानेवारी २०१६ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली आहेत म्हणूनच २९ जानेवारी ते ३१ जानेवारी २०१६ या कालावधीत शताब्दी महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. दादी जानकीजी सर्व मानव मात्रांसाठी उदाहरणमूर्त, आदर्श व प्रेरणामूर्त आहेत.**

वर्तमान समयी दादीजी प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुख्य प्रशासिका या पदावर कार्यरत असूनही नेहमीच हर्षितमुख, डबल लाईट व प्रसन्नचित्त




राहतात. दादीजींची अत्यंत साधी रहाणी व उच्च विचार सरणी सर्वांनाच आकर्षित करते. त्या नेहमीच ॲक्टीव्ह, अलर्ट व एक्युरेट राहातात. तसेच त्या परदर्शन व परचिंतन यापासून मुक्त असतात. त्यांच्याबरोबर कोणीही कधीही व्यर्थ चिंतन करण्याचा विचार देखील करू शकत नाही. केवळ स्वचिंतन, प्रभुचिंतन व ईश्वरी ज्ञानाचे चिंतन त्यांना प्रिय आहे. दादीजींचा नेहमी हा मंत्र पक्का असतो, ''बाबा बैठा है, तू चिंता मत कर। हो जायेगा...'' त्याचबरोबर 'सफेद कपडा और जेब खाली' या धारणेमुळेच दादीजींचे जीवन महान बनले. त्या सदैव उपराम स्थितीत राहून परमशांती व परमसुखाचा अनुभव घेत असतात. म्हणूनच त्यांना 'मोस्ट स्टेबल माइन्ड इन दी वर्ल्ड' (जगातील सर्वाधिक स्थिर मन असणारी) असा किताब देण्यात आला. दादीजींना 'डॉक्टरेट' ही पदवी प्रदान करण्यात आली. अशा या प्रभुशृंगार दादी वैजयंती माळेच्या मणी वा अष्टरत्नांपैकी एक आहेत. त्यांच्याविषयी एका कवीने म्हटले आहे -

**सफेद कपडा जेब खाली,**
**खान लुटाती ज्ञान की।**
**सबको बात सुनाती है,**
**भगवान के वरदान की।**
**शुभभावना सब के लिए,**
**दृष्टि रखती सम्मान की।**
**अष्ट रतन, माला का मणका,**
**डॉ. दादी जानकी।।**

दादीजींचा शताब्दी महोत्सव म्हणजे ब्रह्माकुमारी संस्थेचा मोठा गौरव आहे. एवढे वय असूनही त्यांच्यातील उमंग-उत्साह हा भरपूर आहे. आता सुद्धा त्या देश-विदेशाची यात्रा करून लोकांना ईश्वरी संदेश देण्याचे महान कार्य करीत आहेत. नुकताच जानेवारी १६ मध्ये त्यांनी विदेशाचा दौरा केला. त्या जेथेही जातात तेथे सर्वांमध्ये उमंग-उत्साह व ईश्वरी स्नेह भरतात, शास्त्रातून जनक राजाच्या दोन गोष्टींचे विशेष गायन केले आहे. एक म्हणजे सेकंदात विदेही बनला आणि दुसरं म्हणजे सेकंदात ट्रस्टी

(विश्वस्त) बनला. (अर्थात माझे काहीच नाही सर्व काही ईश्वराचे आहे) या दोन्ही गोष्टी दादी जानकीजींच्या जीवनात देखील पाहायला मिळतात. **त्यामुळे दादी जानकी ह्या जनक राजाचे प्रत्यक्ष उदाहरण आहेत. त्यांना जरासुद्धा कर्तेपणाचे भान नसते. कर्ताकरविता शिवबाबा आहे; मी केवळ निमित्त आहे; हा भाव त्यांच्या मनात भरलेला असतो. त्यामुळेच त्या सदैव 'खुशमिजाज' व 'डबल लाईट' स्थितीत असतात.**

### दादीजींचा जीवन परिचय

दादीजींचा जन्म सन १९१६ मध्ये एका धनाढ्य, सुखी व धार्मिक कुटुंबात झाला. वयाच्या १० व्या वर्षांपर्यंत त्या एका शिक्षकामार्फत घरीच शिकल्या. त्यानंतर ११ व्या वर्षी त्या शाळेत गेल्या. शाळेत तीन वर्ष शिकल्यावर त्यांनी शाळा सोडून दिली. त्यांनी भगवद्गीता, योगवशिष्ठ, भागवत, ग्रंथ साहेब इत्यादी ग्रथांचे घरीच अध्ययन केले. 'सुखमणी' या ग्रंथावर त्यांचा खूपच विश्वास होता. दादीजींनी कोणालाही गुरू केले नव्हते. परंतु साधु-महात्मे दादीजींना चांगल्याप्रकारे ओळखत होते. लहानपणापासूनच, दादीजींना परमात्म प्राप्तीची ओढ होती. म्हणूनच त्यांना सांसारिक गोष्टी पसंत नव्हत्या.

सन १९३७ मध्ये, वयाच्या २१व्या वर्षी, दादीजी 'ॐ मंडलीत' जाऊ लागल्या. तो प्रसंगदेखील अत्यंत अद्‌भुत असा आहे, एकदा त्या आपल्या वडिलांबरोबर सकाळी बागेत फिरायला गेल्या होत्या. फिरून झाल्यावर त्या घरी परतत होत्या. अचानक त्यांच्यासमोर पिताश्री ब्रह्माबाबा आले व त्यांनी मोठ्या प्रेमाने दादीजींना दृष्टी दिली. त्यामुळे दादीजींना एकदम हलकेपणाचा अनुभव आला तसेच त्यांना वाटले की यांच्यामध्ये परमात्मा आहे. त्याचवेळी दादीजींच्या मनात आले की हेच माझे पिता आहेत, यांच्यात परमात्मा आहेत. परिणामतः त्यांच्या जीवनातील परमात्म्याला शोधण्याचे कार्य संपले. त्यांना ही खात्री झाली की आपल्याला परमात्मा भेटले आहेत. (त्यामुळेच दादीजींना 'चलते चलते यूँ ही कोई मिल गया था... हे फिल्मी गीत फार आवडते.') तेव्हापासून लौकिक पित्याकडे राहून 'ॐ मंडलीच्या सत्संगात त्या जाऊ लागल्या.

'दादीजी' यज्ञात राहायला आल्यानंतर एके दिवशी पिताश्री ब्रह्माबाबांनी त्यांना जवळ बोलावून घेतले आणि विचारले की, तू नर्सिंगची सेवा करशील का? त्यावर दादीजी म्हणाल्या, जशी आपली आज्ञा. तेव्हापासून दादीजी मम्मांच्या बंगल्यामध्येच राहू लागल्या व सर्वांच्या तब्येतीची काळजी घेऊ लागल्या. त्यावेळी यज्ञात सुमारे ४०० ब्रह्मावत्स होते. दादीजी रोज सकाळी लवकर उठून रुग्णांची सेवा करीत असत. त्या सेवेमुळे दादीजींना अनेकांचे आशीर्वाद प्राप्त झाले तसेच त्या बाबांच्या समीप आल्या.

एके दिवशी ब्रह्माबाबांनी दादीजींना बोलावून घेतले व त्यांना सांगितले की येथे ट्रेनिंग सेंटर बनेल आणि तू टीचर्सचे ट्रेनिंग करशील. येथे अनेक टीचर्स तयार होतील व त्या देश-विदेशात जाऊन ईश्वरी सेवा करतील. त्यानंतर दादीजींना छोट्या हॉलमध्ये घेऊन गेले व क्लास कसा करायचा, हे देखील शिकवले.

एकदा दादीजी ब्रह्मा बाबांच्या जवळ गेल्या व म्हणाल्या की मी सेवेसाठी जाऊ इच्छिते. तेव्हा बाबांनी दादी प्रकाशमणीजींना बोलावून घेतले व सांगितले की जनक, मुंबईला सेवेसाठी जात आहे. त्यामुळे तिला २५ रु. द्या. लगेचच जानकीदादींनी दोन कपड्याचे जोड घेतले व बाबांची सुट्टी घेण्यासाठी जेव्हा त्या समोर आल्या तेव्हा बाबा म्हणाले, 'आओ मेरी मस्त फकीर बच्ची, सेवा पर जा रही हो!' अशाप्रकारे दादीजींना बाबांनी 'मस्त फकीर' हे टाइटल दिले. त्यानुसार दादीजी आबू रोड हून मुंबई सेंट्रल ला आल्या. तेथून पायीच त्या सेवाकेंद्रावर गेल्या. हे, जेव्हा त्यांच्या लौकिक भावाला माहिती पडले तेव्हा तो त्यांना आपल्या घरी घेऊन जाण्यासाठी आला. त्यावेळी दादीजी आपल्या भावाला म्हणाल्या की मरेन तर येथेच मरेन, येथून कुठेही जाणार नाही. दादीजी आपल्या आईला भेटण्यासाठी सुद्धा सात दिवसानंतर गेल्या होत्या. त्यांच्या आईला देण्यासाठी बाबांनी एक बंद पाकिट दिले होते. परंतु त्यात काय लिहिले आहे, हे मात्र दादीजींना माहीत नव्हते. पाकिटातील चिठ्ठी जेव्हा दादीजींच्या आईने वाचली तेव्हा त्यात लिहिले होते की, **'अष्ट रत्न में आने वाली जनक बेटी तेरे पास आ रही है।'**

**बाबांचे हे वरदानी बोल वाचून दादीजींना खूप आनंद झाला.**

दादीजी मुंबईला आल्यानंतर जेथे सत्संग चालत असत तेथे जाऊन कल्पवृक्षाच्या चित्रावर समजावून सांगत असत. संध्याकाळी महालक्ष्मीच्या मंदिरात जाऊन सेवा करीत असत. कधी लायब्ररीत तर कधी किंग सर्कल मध्ये तर कधी मंदिरात जाऊन सेवा करीत असत. सगळीकडे त्या पायी चालत जात असत. त्यांनी कुणाकडून कधी लिफ्ट मागितली नाही. जेव्हा भूक लागत असे तेव्हा त्या एक आण्यात ४ केळी घेऊन खात असत. त्यानंतर बाबांनी खाण्यासाठी १ रुपया खर्च करण्याची परवानगी दिली. परंतु दादीजी फक्त ४ आणेच खर्च करीत असत. जेव्हा त्या बंगलोरला सेवेसाठी गेल्या तेव्हा ८ आणे खर्च करू लागल्या. चार आण्याचे नारळ पाणी व ४ आण्याचे गाजर व टोमॅटो त्या घेत असत. अशाप्रकारे इकॉनॉमी (बचत) व एकनामी (एक बाप दुसरा कोणी नाही) असा त्यांचा स्वभाव आहे.

### चाळीस दिवसांची योगभट्टी

एकदा ब्रह्माबाबा मुंबईला आले होते. काही दिवस राहिल्यानंतर ते परत मधुबनला जात होते. त्यांच्याबरोबर दादी जानकीजी देखील मधुबनला आल्या. त्यावेळी दादींनी ४० दिवसांची योगभट्टी एका खोलीत बसून केली. एके दिवशी दादींनी बाबांना विचारले की, बाबा! तुम्ही अंतिम समयी धर्मराज बनणार आहात परंतु धर्मराजकडून मला कुठलीही शिक्षा नको आहे. त्याने अगदी डोळे वटारून सुद्धा पाहायला नको. तेव्हा बाबा म्हणाले, मुली, धर्मराज तुला डोळे वटारून पाहाणार नाही. तेव्हा दादीजींनी ४० दिवस एका खोलीत बसून योगभट्टी केली; जेणेकरून धर्मराजकडून कुठलीही शिक्षा होऊ नये. या भट्टीच्या कालखंडात ब्रह्मा बाबा रोज येऊन शक्तिशाली दृष्टी देत असत. तसेच त्यावेळी आपले सर्व विकर्म विनाश होत आहेत, असा अनुभव दादीजींना होत असे. आजही ती योगभट्टी दादीजींना आठवते. खरोखर कमाल होती त्या योगभट्टीची!

### दादीजींना ब्राह्मण परिवाराला भेटण्याची फारच उत्कंठा असते

मागील वर्षाची ही गोष्ट आहे. दादी जानकीजींची तब्येत जरा नरम होती. त्यामुळे त्यांना अहमदाबादच्या एक हॉस्पिटलमध्ये (I.C.U. मध्ये) ठेवण्यात आले होते. त्यावेळी मधुबनचा एका भाई त्यांना भेटण्यासाठी गेला होता. त्यांनी बोलता बोलता दादीजींना समाचार सांगितला की शांतीवनमध्ये बाबामीलनसाठी २० हजार भाई-बहेन आलेले आहेत. दादीजींनी लगेच डॉक्टरांना बोलावले आणि सांगितले की मला ताबडतोब शांतीवनमध्ये जायचे आहे. तेथे २० हजार भाई-बहेन आलेले आहेत. तुम्ही या नळ्या, बाटल्या सर्व काही काढा; नाही तर मी असेच घेऊन जाईन. त्यावर डॉक्टर म्हणाले की दादीजी, तुमची तब्येत ठीक नाही. तेव्हा दादीजी म्हणाल्या, 'मी औषधांमुळे जिवंत नाही. मी शिवबाबांच्या मदतीमुळे जिवंत आहे.' त्यावेळी दादीजींची ब्राह्मणी (ब्र. कु. हंसा बहेन) म्हणाली की आता रात्रीचे १०.३० वाजले आहेत. आपण सकाळी शांतीवनला जाऊ. त्यावर दादीजी म्हणाल्या की हवं तर तू इथं रहा. मी चालले, लगेचच दादीजींनी गाडी मागवली व त्या सकाळी ३ वाजता शांतीवनमध्ये पोहचल्यासुद्धा. ठरल्याप्रमाणे दादीजींनी २० हजार ब्रह्मावत्सांना अमृतवेळेचा योग करविला तसेच सकाळी मुरलीसुद्धा वाचली. असा आहे दादीजींचा सेवेचा उमंग-उत्साह व ब्राह्मण परिवाराविषयी वाटणारे प्रेम! यालाच म्हणतात सेवेत श्वासोश्वास सफल करणे. दादीजींना आपण सर्वांनी फॉलो करणे आवश्यक आहे.

### दादीजी सर्वांना सेवेसाठी उमंग-उत्साह देतात

मी एकदा दादीजींना भेटायला गेले व त्यांना सांगितले की मी ८०० जेल व ५००० शाळांमध्ये जाऊन सेवा केल्यामुळे माझे नाव 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये अंतर्भूत करण्यात आले आहे. **हे ऐकून दादीजी खूपच खुश झाल्या व त्यांनी मला वरदान दिले की 'तू भीमाचे कार्य करीत आहेस. भोजन बनविण्याची ड्यूटी सांभाळून, तू ठिकठिकाणी जाऊन वाचा सेवा करीत आहेस.'** त्यानंतर मी ज्ञानात कसा आलो, हे दादीजींना सांगितले. त्यावेळी त्या म्हणाल्या की 'कर्ताकरविता शिवबाबा' गरीब नवाज आहे. तो आपल्या गरीब मुलांचे भाग्य श्रेष्ठ बनवित आहे. येवढेच नव्हे तर मी जेव्हा माझ्या लेखांचा संग्रह (अमृतधारा पुस्तक) दादीजींना दाखवले तेव्हा त्यांनी शुभेच्छापर दोन शब्द लिहून दिले. अशा प्रकारे दादीजी दुसऱ्यांच्या विशेषतांची कदर करून त्यांना सदैव उमंग-उत्साह देत

असतात.

**ज्ञानगंगा - दादी जानकीजी**

दादीजींच्या रोम-रोमात 'बाबा' सामावलेले आहेत. त्यामुळेच त्या सर्वांच्या रोम-रोमात बाबांची आठवण देण्यासाठी निमित्त बनल्या आहेत. दादीजी रूप-वसंत आहेत. दादीजींचे बोल सर्व ब्रह्मावत्सांना उमंग-उत्साह देणारे आहेत. दादीजींचा क्लास ऐकताना सर्वजण मंत्रमुग्ध होऊन जातात. त्यांच्या क्लासेसची अनेक पुस्तके (ज्ञान सुमन प्रवचन संग्रह) प्रकाशित करण्यात आली आहेत तसेच त्यांच्या क्लासेसवर आधारित पुढील इंग्रजी पुस्तके देखील प्रकाशित करण्यात आली आहेत. 1) Wings of Souls 2) Pearls of Wisdom 3) Companion of God 4) Inside Out 5) Spiritual Greatness.

दादीजींच्या विषयी एका कवीने अतिशय सुंदर शब्दात वर्णन केले आहे -

**तीन-तीन बाते आप बताती,**
**सबके हितकल्याण की।**
**राजयुक्त हर बात सुनाती,**
**मानव के उत्थान की।**
**१०० साल की उम्र मे भी,**
**करती बात जवान की।**
**अष्ट रतन, माला का मणका,**
**डॉ. दादी जानकीजी।।**

दादीजींच्या मानव उत्थानाच्या या महान कार्यामुळेच, त्यांना सन १९९५ मध्ये G.I.T.M (Gandhi Institute of Technology & Management) विद्यापीठ, विशाखापट्टण द्वारे 'डॉक्टरेट' पदवी बहाल करण्यात आली. दादी जानकीजी सन १९७४ मध्ये ईश्वरी सेवेसाठी लंडन येथे गेल्या होत्या. त्यानंतर सन १९७४ ते २००७ या सुमारे ३३ वर्षाच्या कालखंडात त्यांची १०० हून अधिक देशात, ईश्वरी सेवेचा विस्तार केला. पुढे ऑगस्ट २००७ पासून त्या संस्थेच्या 'मुख्य प्रशासिका' म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे जीवन सर्वांसाठी आदर्श उदाहरणमूर्त व प्रेरणादायी आहे. **अशा ब्राह्मण परिवाराच्या फाऊंडेशन, अमूल्य रत्न, सदा संतुष्टमणी, सदा डबल लाईट, चक्रवर्ती, प्रभुशृंगार दादी जानकीजींना, त्यांच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने विश्वातील सर्व ब्रह्मावत्सांच्या हार्दिक पद्मा-पद्म शुभभावना व शुभकामना!** ▪▪

# पुण्य आत्म्याचे १६ लक्षण...

१. पुण्य आत्मा अर्थात ज्याचा प्रत्येक सेकंद व संकल्प कल्याणकारी आहे.
२. पुण्य आत्मा अर्थात ज्याची वृत्ती सदा बाप समान विश्व कल्याणकारी आहे.
३. पुण्य आत्मा अर्थात आपल्या मुखाने सदैव ज्ञानरत्न वा अमूल्य बोल बोलणारा.
४. पुण्य आत्मा अर्थात सदा बापसमान समर्थ स्मृतीत राहाणारा.
५. पुण्य आत्मा अर्थात सदैव कोणत्या ना कोणत्या खजिन्याचे महादान करून पुण्य कमविणारा.
६. पुण्य आत्मा अर्थात कर्मबंधनी आत्म्यांना स्वतंत्र बनविणारा.
७. पुण्य आत्मा अर्थात असंभव गोष्टीला सहज संभव करणारा.
८. पुण्य आत्मा अर्थात लाइट हाऊस बनून, भटकणाऱ्या आत्म्याला योग्य ठिकाण दाखविणारा.
९. पुण्य आत्मा अर्थात अनेक आत्म्यांचे सद्‌भाग्य घडविणारा.
१०. पुण्य आत्मा अर्थात अनेक आत्म्यांचा संबंध शिवबाबांशी जोडून, त्यांना मालामाल बनविणारा.
११. पुण्य आत्मा अर्थात आपल्या पुण्याद्वारे अनेक गरीबांना सावकार बनविणारा.
१२. पुण्य आत्मा अर्थात विकारांच्या आगीत जळणाऱ्या आत्म्यांना शीतल बनविणारा.
१३. पुण्य आत्मा अर्थात स्वतःच्या तसेच अन्य आत्म्यांच्या प्रति पुण्याचे खाते जमा करणारा.
१४. पुण्य आत्म अर्थात 'मन्मनाभव' चा महामंत्र देऊन अनेकांची सद्‌गति करणारा
१५. पुण्य आत्मा अर्थात प्रत्येक कर्मात बापसमान चरित्रवान.
१६. पुण्य आत्मा अर्थात आपल्या शुद्ध संकल्पाद्वारे आत्म्यांना पद्मा-पद्मपति बनविणारा. ▪▪

अनुभव

# यू-टर्न

- ब्र.कु. नवनाथ कोलापकर, पुणे.

आपण जन्माला आलो आणि जिवंत आहोत म्हणून जगतो आहोत. बाकी आपल्या जगण्याला कोणतेही उद्दिष्ट नाही, जगण्यासाठी कोणतेच ध्येय नाही अशा प्रकारचे जीवन मी या प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात येण्यापूर्वी जगत होतो.

२००५ साली विठ्ठलभाई कर्चे नावाच्या व्यक्तीने मला या विश्व विद्यालयाच्या संपर्कात आणलं आणि मी माउंट आबू इथं पोहोचलो. एका वेगळ्याच विश्वात प्रवेश केल्याची जाणीव तत्क्षणी मला झाली. या कलियुगी दुनियेपेक्षा वेगळी दुनिया, या मायावी दुनियेपेक्षा निराळे वागणारे लोकही या दुनियेत असू शकतात हे पाहून आश्चर्य वाटलं. पृथ्वीवरचा स्वर्ग इथेच असल्याची जाणीव झाली. आपलं मायावी, विकारी जग वेगळं आहे हे इथं पाऊल ठेवताक्षणी जाणवलं.

इथल्या व्यक्तींच समर्पण बघून मन हेलावून गेलं. अशाही व्यक्ती कशा असू शकतात? कुठलीही अपेक्षा न ठेवता इतक्या निरपेक्ष वृत्तीनं हे लोक या विश्व विद्यालयात झटतात, सेवा करतात हे जगावेगळं आहे. कुठलीही अपेक्षा न ठेवता कसं राहू शकतात हे लोक? आश्चर्य वाटलं. पगार न घेता, भविष्याचा, स्वहिताचा कुठलाही विचार न करता कुणासाठी जगतात हे? आणि उद्दिष्ट काय यांचं?

इतर धार्मिक संस्थांमध्ये लोक पाहिले, कर्मचारी पाहिले पण ते पगार घेऊन काम करतात. इथं मात्र कुठलाही पगार नाही, तरीही मनापासून, स्वतः चं काम आहे असं समजून, तन्मयतेनं काम करतात. अशक्य कोटीतील गोष्ट यांनी शक्य करून दाखवली.

हॉलमध्ये गेल्यानंतर दादीजींचे वाक्य माझ्या कानी पडले आणि या प्रश्नाचं उत्तर सापडलं. दादीजी म्हणत होत्या- ''कशासाठी करताहात तुम्ही हे सगळं? हे वाईट वागणं आणि भ्रष्ट आचार कशासाठी? लहानपणी आईवडिलांनी तर तुम्हाला असं वागायला शिकवलं नव्हतं. शाळेत गेल्यानंतर शिक्षकही असं वाईट वागायला शिकवत नाहीत. तरीही तुम्ही वाईट का वागता? तुमच्या अशा वागण्याची कुणीतरी स्तुती करतंय कां? तुम्हाला असं वाटत असेल की मी हे घरच्यांसाठी करतोय. मग घरच्यांना विचारा की तुम्ही माझ्या या पापात सहभागी आहात का? तर उत्तर काय येईल? ''नाही'' हेच येईल. मग कुणासाठी करताहात हे सगळं? **तुमचं अंतर्मन तुम्हाला सांगतं- आपण चुकतोय. तुमचा मूळ स्वभाव असे वागण्याचा नाही. तुम्ही जन्मतः वाईट नव्हताच; मग आता तरी कशाला असं वागता? द्या सोडून हे सगळं. आजपासून - नव्हे आत्तापासूनच.''**

**आणि तेव्हापासून माझ्या जीवनाच्या गाडीनं यू-टर्न घेतला. अचानक मी बदललो. या विश्व विद्यालयातील लोकांना ज्यापासून ही शक्ती मिळते, त्या परमात्म्याच्या परम शक्तीची जाणीव मला झाली.** माणसाच्या हातून हे काम होऊच शकत नाही. इतरांची गोष्ट सोडा. आपली मुलंसुद्धा आपण आपल्यासारखी घडवू शकत नाही. आपण कितीही ठरवलं तरी आपल्या आप्त स्वकीयांमध्ये परिवर्तन घडवून आणू शकत नाही. त्यामुळे विश्वाचं परिवर्तन करणं तर अशक्यच. आणि या विश्व विद्यालयाच्या माध्यमातून मात्र लाखो लोकांचं परिवर्तन होतंय. अनेक लोक सन्मार्गाला लागतायत. या मागे ईश्वरी शक्ती आहे.

दादीजी पुढं म्हणत होत्या- ''आपली वाईट कृत्य आपण इतरांपासून लपवू शकतो; पण

परमात्म्यापासून नाही लपवू शकत. आपल्याला कुणी पाहात नसेल पण तो आपल्याला सतत पाहात असतो. आपल्याला कुणी पाहात नाही ना, याची खात्री करूनच आपण वाईट कृत्य करतो. **मग परमात्मा आपल्याला सतत पाहात असताना आपण वाईट कृत्य का करावं? आणि तेव्हापासून जीवनाचं गणितच बदललं. आपल्या जीवनाचं अंतिम ध्येय काय आहे हे कळलं. आपल्याला देवी-देवता बनायचं आहे. तर मग त्यांच्यासारखं नको का वागायला?''**

तेव्हापासून मी खूपच हलका झालो. जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलला. जीवनात कोणतीही घटना घडली तरी काही वाटेनासं झालं. शिवबाबांनी मुरलीतून सांगितले आहे की, ''जो कुछ भी हो रहा है वा होनेवाला है वह सब अच्छा है और नया कुछ नही हो रहा है। ऐसी घटनायें कल्प पहले भी हुई थी। अब सिर्फ रिपीट हो रही है।'' एक प्रकारचा साक्षीभाव निर्माण होऊ लागला. कशाचंच काही वाटत नाही आता. बेफिकर बादशहा झालो. जीवनात एक नवचैतन्य उसळलं. 'बाबा सदा मेरे साथ है' ही जाणीव झाली. शिवबाबा म्हणतात त्याप्रमाणे 'उपराम' अवस्था झाली. या आधी कुणी बोललं की खूप राग यायचा; आणि आपण त्याचा बदला घेतला पाहिजे अशी वृत्ती अंगी असायची. आता कुणी रागावलं तर मी किनारा करतो. विषय बदलतो. रागावणाराही विसरून जातो. बदला घेण्याची भावना राहिलीच नाही. सर्वांप्रती शुभभावना. सर्वांचं चांगलं व्हावं असं वाटायला लागलं. या आधी आपल्या शेजाऱ्यानं काही चांगली वस्तू घेतली किंवा त्याला जास्त पैसे मिळायला लागले की असूया वाटायची, मत्सर वाटायचा. ही वाईट भावना आता राहिलीच नाही. शेजाऱ्यांप्रतीही शुभभावना निर्माण झाली.

आधी वस्तूंना खूप जपायचो. एखादी वस्तू हरवली तर रुखरुख लागून राहायची. साधा १० रु.चा पेन पण ''माझा'' पेन हरवला म्हणून दुःख व्हायचं. वस्तूंमध्ये माझंपण अडकून पडलं होतं. आता वस्तू हरवली तरी काही वाटत नाही. वस्तूसारख्या वस्तू अनेक मिळू शकतात मग कशाला वाईट वाटून घ्यायचं? शिवबाबा म्हणतात- **चिंता करू नका, चिंतन करा. तसा मी बाबांच्या आठवणीत राहायला लागलोय. आणि जेवढी बाबांची आठवण जास्त तेवढा माझ्यामध्ये उत्साह जास्त अशी जाणीव निर्माण झाली.**

एकाला कोणत्या वातावरणात रहायला आवडतं, तर दुसऱ्याला कोणत्या वातावरणात राहायला आवडतं. माझं वातावरण मात्र मी ठरवून टाकलंय- 'एक बाबा, दूसरा न कोई.' मला याच वातावरणात राहायला आवडतं, आनंद मिळतो. मग असं वातावरण कुठंही असो तिथं मी जातो. मी कोणत्या वातावरणात राहावं हे निवडण्याचा अधिकार मला आहे. प्रत्येकालाच आहे. जितका या वातावरणात मी जास्त राहतो तितका मी आनंदी असतो. आता मला सवय झालीय असं वातावरण निर्माण करण्याची- जेथे बाबांची आठवण, जेथे असं वातावरण; तेथे व्यर्थ विचार टिकत नाहीत, पळून जातात. आता मला जीवनाचं लक्ष्य मिळालंय. त्यामुळे मला लक्षणांची सतत काळजी असते. इथून मागं जे झालं ते झालं. बाबा म्हणतात, 'बिती को बिंदी लगाओ', तसं मी करतो. उद्दिष्ट खूप मोठं आहे. लांबचा पल्ला गाठायचाय. मग त्या दृष्टीनं प्रत्येक पाऊल नको का पडायला? आतापर्यंत जे व्यर्थ कर्म केले, जे झालं ते झालं- गंगेला मिळालं. तेच ते उगाळण्यात काय अर्थ? आता प्रत्येक क्षणी मी काटेकोरपणे लक्ष देतोय. आपल्या खात्यात आता एकही नवीन विकर्मांची भर नको पडायला. सुकर्मांची भर घातली पाहिजे. कदाचित एखादे वेळी चांगल्या कर्माचं खातं वाढलं नाही तरी चालेल पण एकाही विकर्माची भर पडायला नको, याची दक्षता मी घेतोय. ताकही फुंकून पितोय मी आता. कारण त्याशिवाय ध्येयाप्रत, उद्दिष्टांकडे जाणार कसं?

सगळ्या नद्या शेवटी समुद्रालाच येऊन मिळतात. मग नद्यांकडे कशाला जायचं आपण! थेट सागराकडे- ज्ञानाच्या सागराकडेच जाऊ या. कुणाच्याही जीवनाचं अंतिम लक्ष्य

तेच आहे. फक्त कुणाला लवकर कळतं आणि कुणाला उशीरा कळतं, एवढाच फरक आहे. घरी जाण्याचा सरळ रस्ता माहित असेल तर आडवळणाच्या रस्त्यानं का जायचं?

नवीन घरी जाण्यापूर्वी सगळं पॅकिंग करून ठेवलं पाहिजे. आपल्या बदलीची ऑर्डर निघालेली आहे. आपल्या आवडीच्या ठिकाणी बदली झालेली आहे. फक्त ते पद ग्रहण करण्यासाठी पदग्रहण अवधी (संगमयुग) सध्या चालू आहे. आता जुनं पद मनानं सोडलं आहे. कार्यमुक्त झालेलो आहे. आता नवीन पदाची उत्कंठा लागलीय. एकाच ठिकाणी जास्त सेवा झाली की कंटाळा येतो. नवीन ठिकाणी हजर व्हायचं. त्या पदाची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या खूप मोठ्या आहेत. त्यादृष्टीनं ते पद पेलता यावं म्हणून या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात प्रशिक्षण पूर्ण होताच मला नवीन पदाची जबाबदारी स्वीकारायचीय.

**या जीवनानं मला बरंच काही दिलं. या जीवनामुळंच मला परमपित्याची आठवण आली. 'पाना था सो पा लिया' आता बाकी काही राहिलं नाही. जीवन पूर्णतेने जगल्याची भावना निर्माण झालीय. या जीवनाविषयी आणि दुनियेविषयी मोहाची भावना आता कमी होत चाललीय. बरंचसं पॅकिंग झालंय. एव्हररेडी होण्याचा प्रयत्न चालू आहे. कधीही ऑर्डर हातात पडू शकते.** या घराचं वा दुनियेचं आकर्षण आता राहिलेलं नाही. वैराग्याची भावना निर्माण होऊ लागलीय. कधी एकदा नवीन घरी पोहोचतो असं झालंय. 'जशी दृष्टी तशी सृष्टी' असं म्हणतात. जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोनच आता बदलून गेलाय. या विश्व विद्यालयात आल्यापासून इतरांचाही माझ्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललाय. या विश्व विद्यालयानं मला प्रतिष्ठा दिलीय. या विश्व विद्यालयामुळेच हे परिवर्तन होऊ शकलं. आणि या जगाचंही परिवर्तन लवकरच घडणार आहे. या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमातून - आता मनाला एकच ध्यास लागला आहे

**बदलेंगे तस्वीर विश्व की,**
**परमपिता शिव की संतान।**
**घर घर में खुशहाली होगी,**
**मानव होगा देव समान।।**

■■

# आपल्या जीवनाचे लक्ष्य काय असावे?

**(सन २०१६ साठी सोळा होम वर्क)**

**प्रत्येक ब्रह्मावत्साचे लक्ष्य आहे बापसमान बनणे. परंतु हे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी, आपल्या दैनंदिन जीवनात छोटे-छोटे लक्ष्य निर्धारित करण्याची आवश्यकता आहे. जसे-**

१. अमृतवेळेच्या योगाचे संपूर्ण सुख अनुभव करा.
२. रोज एक अव्यक्त मुरली वाचून, त्यातील भाव आपल्या शब्दात नोट करा.
३. क्लासमध्ये मुरली एकाग्र चित्त होऊन ऐका.
४. मुरलीतील पॉईंटवर विचार सागर मंथन करा.
५. सदैव आत्मअभिमानी स्थितीत राहा व सर्वांना आत्मिक दृष्टीने बघा.
६. सर्व आत्म्यांविषयी सदैव शुभभावना व शुभकामना ठेवा.
७. रोज एक स्वमान घेऊन दिवसभर त्याचा अभ्यास करा.
८. भोजन करताना योगयुक्त होऊन भोजन करा.
९. सदैव श्रीमतावर चाला, श्रीमतामध्ये कधीही मनमत मिक्स करू नका.
१०. संपूर्ण दिवसभर कर्मयोगी बनून कर्म करा.
११. आळस व बेपर्वाई यांच्यामुळे आपला वेळ व्यर्थ घालवू नका.
१२. दिवसाचा काही वेळ काढून विश्वातील सर्व आत्म्यांना सकाश (शक्ती) द्या.
१३. आपल्या मन, वचन, कर्माद्वारे सर्वांना सुख द्या. कोणालाही दुःख देऊ नका.
१४. कधीही दुसऱ्याला पाहू नका. केवळ स्वतःला पाहा व स्वपरिवर्तन करा.
१५. सदा संतुष्ट रहा व सर्वांना संतुष्ट करा.
१६. रोज रात्री झोपण्यापूर्वी साऱ्या दिवसाचा चार्ट चेक करा नंतर बाबांच्या मधुर आठवणीत झोपा.

■■



# सद्गुरू परमात्म्याच्या अवतरणाचा दिव्य संदेश

**– ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे**

आत्मिक बंधुंनो,

आपण सर्व मनुष्य आत्मे एकाच परमपिता परमात्म्याची संतान आहोत. म्हणून सर्व मनुष्य आत्म्यांच्या प्रति महान संदेश आहे की, गेल्या ७९ वर्षापासून परमात्मा अवतरित होऊन सद्गतीचे अमूल्य ज्ञान देत आहे. अर्थात तोच मनुष्य आत्म्यांचा एकमात्र सद्गुरू आहे. त्याच्या अवतरणाचा संदेश देण्याचा उद्देश हाच आहे की, विश्वातील सर्व मनुष्य आत्म्यांनी त्या वास्तविक भाग्यविधात्या सद्गुरूला तसेच त्याच्यापासून होणाऱ्या अलौकिक व अविनाशी प्राप्तींना जाणून आपले सर्वोत्तम भाग्य बनवावे. साधकांनो, सद्गुरू तोच आहे जो जन्म मृत्यूच्या चक्रात येत नसल्याने सतो, रजो, तमो ह्या आत्मिक स्थितींच्या चक्रातही येत नाही. सद्गुरू त्यालाच म्हणावयाचे जो धर्मग्लानीसमयी परमधामातून ह्या साकार सृष्टीवर अवतरित होतो, जो समस्त जगताचा गुरू अर्थात जगतगुरूही आहे. ह्या निराकार ज्योतिस्वरूप जगत्गुरूलाच भगवान, परमात्मा, अल्लाह, गॉडफादर अर्थात 'सबका मालिक एक' म्हणून सर्व धर्मातील सर्व मनुष्य आत्म्यांची मान्यता प्राप्त होऊ शकते, अर्थात अशी मान्यता कोणत्याही देहधाऱ्याला प्राप्त होऊ शकत नाही. **जगत्गुरू तोच आहे जो ह्या अनाकलनीय जगताच्या आदि, मध्य व अंताचे यथार्थ ज्ञान देऊ शकतो. जो ब्रह्मा, विष्णु शंकराचाही रचयिता आहे. ह्या त्रिदेवांच्या द्वारेच तो स्थापना, पालना व विनाश ही तीन कर्तव्ये करवून घेतो. जो वर्तमान समयी अर्थात पुरुषोत्तम संगमयुगावर ब्रह्मा द्वारा एक सत्य धर्माची व सत्य युगाची स्थापना करीत आहे. हा जगताचा सद्गुरू, परमपित्याच्या संबंधात सर्व मनुष्य आत्म्यांना २१ जन्मांसाठी पवित्रता, सुख, शांतीचा वारसा प्राप्त करवून देत आहे.** मनुष्य आत्म्यांचे असे सर्वोत्तम कल्याण करणाऱ्या निराकार सद्गुरूची अंतिम समयी प्रत्यक्षता होईलच. तत्पूर्वी, त्याला ज्ञाननेत्राने अवश्य जाणावे. अशा प्रकारे जो त्याला ज्ञानाच्या तिसऱ्या नेत्राने जाणतो तो मनुष्यात्मा सद्गुरूला अधिक प्रिय आहे.

बंधुंनो, गुरू करणे ही तर मानवी जीवनातील आवश्यक अशी परंपरा आहे. गुरूंनी केलेल्या मार्गदर्शनाचा आदर ठेवून कृतज्ञता व्यक्त करणे हे प्रत्येक शिष्याचे कर्तव्य आहे. परंतु, ज्यावेळी हा गुरूंचाही सद्गुरू शिव परमात्मा अवतरित होतो त्यावेळी प्रत्येक साधकाने त्याचा सद्शिष्य बनणे अत्यावश्यक आहे. ''हा आमचा सद्गुरू तो तुमचा सद्गुरू.'' असा सद्गुरूविषयी आप परभाव असणे हे तर अज्ञान आहे. वास्तविक एकमात्र सद्गुरू तोच आहे जो आत्म्याची गती व सद्गती करतो. सद्गती अर्थात मनुष्य आत्म्याला पावन बनवून कलियुगी नर्कातून सत्ययुगी स्वर्गात दैवी जन्म प्राप्त करवून देणे होय! परंतु, दुर्दैव असे की, अशा सर्वाधिक कल्याणकारी सद्गुरूकडे न

येण्याची कारणे सांगितली जातात की, ''आम्हाला आमचे गुरू, त्यांचा सत्संग सोडण्याची अनुमती देत नाहीत, अथवा आम्ही आमच्या गुरूंच्याकडून अनुग्रह घेतला आहे.'' अशा सर्व कारणांच्या निवारणार्थ प्रत्येक शिष्याला निराकार सद्‌गुरू परमात्म्याचा आदेश आहे की, ''हे वत्स, मज सद्‌गुरूद्वारा तुजला जन्मजन्मांतरासाठी अलौकिक व अविनाशी प्राप्ती हवी असेल तर मनुष्य मत व शास्त्र मताला विसरून केवळ मज सद्‌गुरूच्या श्रीमताचाच स्वीकार कर.'' अर्थात, ह्या श्रीमतानेच आत्म्याची सद्‌गती होईल. सर्व सत्संगातील सर्व गुरूंच्या सहित सर्व साधकांचे अंतिम लक्ष्य हेच आहे की, त्या सद्‌गुरू परमात्म्याशी मंगल मिलन होऊन आत्म्याचा उद्धार व्हावा. **हा उद्धारकर्ता सद्‌गुरू ज्यांच्या शरीरात अवतरीत होतो ज्या प्रजापिता ब्रह्मानेही आपल्या लौकिक जीवनात बारा गुरू केले होते. परंतु सद्‌गुरूचे अवतरण होताच विश्वकल्याणार्थ गुरूंना सोडण्याचा निर्णय त्यांनी तात्काळ घेतला. गुरूनंतर सद्‌गुरूची प्राप्ती होणे ही तर आध्यात्मिक जीवनातील सर्वात वरची पायरी आहे. ज्यावेळी एखादा विद्यार्थी १०वी पास होतो त्यावेळी पुढील शिक्षणासाठी त्याला कॉलेजमध्ये जाणे आवश्यक असते. अर्थात दहावीचे शिक्षकही त्याला आनंदाने निरोप देतात. तद्वतच आपल्या शिष्यांच्या कल्याणार्थ त्यांना सद्‌गुरूकडे जाण्यासाठी गुरूंनी आनंदाने निरोप द्यावा** आणि ज्यावेळी असे शिष्य सद्‌गुरूकडे येतात त्यावेळी सद्‌गुरू परमात्मा प्रथमतः इंद्रियजीत विकर्माजीत, प्रकृतिजीत व मायाजीत बनविण्यासाठी आपल्या सद्‌शिष्यांना कर्म, अकर्म, विकर्म व श्रेष्ठ कर्माच्या गहन गतीचे ज्ञान प्रदान करतो. तसेच अनेक गतजन्मांची विकर्मे भस्म होण्यासाठी तो राजयोगही शिकवतो. अशाप्रकारे ज्ञान व योगाच्या आधारे अज्ञान व अंधश्रद्धेचा अंधकार पूर्णतः नष्ट होऊन मानवी जीवन निष्कलंक अशा हिऱ्याप्रमाणे चारित्र्यसंपन्न बनते. **हा शिव परमात्मा मानवी जीवनातील अज्ञान अंध:काराची रात्र कल्पकल्प समाप्त करतो म्हणून शिवरात्री उत्सवाचे महत्त्व असाधारण आहे. परंतु अज्ञानवश हा उत्सव शंकराचा आहे असे मानून साजरा केला जातो हे दुर्दैव होय!** (शिव आणि शंकर पूर्णत: भिन्न आहेत)

बंधुंनो, आता ह्या अंतिम जन्मात आपल्या सर्वांचे हे एकच परमकर्तव्य राहिले आहे की, त्या परमपित्याला त्याच्या महान कार्यात सहयोग देणे. ह्या सहयोगाविषयी भगवद्‌गीतेत अंतःकरणाला भिडणारे महावाक्य आहे की, ''जो मनुष्य हे सृष्टिचक्र चालविण्यामध्ये परमात्म्याला सहयोग देत नाही अर्थात आपल्या कर्तव्याचे पालन करीत नाही अशा मनुष्याचा जन्म व्यर्थ आहे'' (अध्याय, श्लोक ३-१६) ह्या अनमोल महावाक्यातून आपण हीच प्रेरणा घ्यावी की, एक सत्यधर्म व सत्ययुग स्थापनेच्या ह्या महान कार्यात आत्मोन्नती साधून परमात्म्याला सहयोग देणे हे माझे परम कर्तव्य आहे. अन्य युगे ही मानवाच्या आत्मिक पतनामुळे निर्माण होतात. परंतु उद्धारकर्ता परमात्मा वर्तमान समयी पतित कलियुगी नरकापासून उद्धारित असा पावन सत्ययुगी स्वर्ग स्थापन करीत आहे. त्यासाठी परमात्म्याच्या ह्या महान कार्यात आपण सर्व धर्मातील सर्व मनुष्यआत्मे भेदभाव विसरून पूर्णतः सहयोग देऊया. ह्या सहयोगानेच सर्वोदय होऊन भारतात सात्त्विक सुखशांतीने युक्त असे सत्ययुगी दैवी स्वराज्य निर्माण होईल. असे महान सत्कार्य परमात्मा प्रत्येक कल्पाच्या अंताला करतो. म्हणून म्हटले जाते की, 'परमात्माच ह्या विश्वाचे अंतिम सत्य आहे.' अर्थात त्याच्या ह्या परम सत्याला स्वीकारणाऱ्या मनुष्य आत्म्यांचा अंतिम विजय निश्चित आहे. बंधूंनो, तुम्हास असे वाटत नाही का की, आपणही विश्वातील ह्या अभूतपूर्व विजयात सहभागी होऊन परमानंद प्राप्त करावा? **आपल्या सर्वांचा परमपिता एक आहे, सद्‌गुरू एक आहे व भगवान एक आहे ह्या विषयावर प्रथमतः एकमत करून एकता निर्माण करूया. वैश्विक एकतेचा आधार केवळ एक सद्‌गुरू परमात्मा आहे जो मानवमात्राला देवत्त्वपद प्रदान करून स्वर्गीय सुवर्णमय भारतात प्रदीर्घ काळासाठी शाश्वत सुखशांती प्रस्थापित करतो. अशा शांतिसागर परमात्म्याला आम्हा ब्रह्मावत्सांचे कोटी कोटी प्रणाम। कोटी कोटी प्रणाम।। कोटी कोटी प्रणाम।।**

■■

# ईश्वर आहेच, मात्र त्याचा शोध घेण्यासाठी अंतर्चक्षू विकसित करणे गरजेचे....

**-ब्र.कु. किशोर साटम,** वसई

**ज्या प्रमाणे दूध हे लिटरमध्ये मोजतात, ते मीटरमध्ये मोजून चालत नाही. लांबी ही मीटरमध्ये मोजतात, ती लिटरमध्ये मोजून चालत नाही, त्याप्रमाणेच ईश्वराचा शोध हा चर्मचक्षूंनी घ्यावयाचा नसून, अंतर्चक्षूंनी, सूक्ष्म कर्मेंद्रियांच्या चक्षूंनी घ्यावयाचा असतो. स्थूल लांबी मोजण्यासाठी वापरण्यात येणारे साधन ज्याप्रमाणे अधिकाधिक विकसित करता येते, त्याप्रमाणेच अंतर्चक्षूंनाही अधिकाधिक विकसित, शक्तिशाली बनवता येणे शक्य आहे. मात्र त्यासाठी नित्य साधना आणि नित्य नवनवीन आध्यात्मिक प्रयोगांची गरज आहे आणि त्यासाठी वेळ देणे गरजेचे आहे.**

एका लोकप्रिय मराठी वृत्तपत्रात अलीकडेच प्रसिद्ध झालेला एका विद्वानाचा ईश्वराचे अस्तित्त्व नाकारणारा लेख वाचनात आला. मनुष्याने पदार्थविज्ञान शास्त्रात, खगोलशास्त्रात अचंबित करून टाकणाऱ्या प्रगतीचा मागोवा घेत, पदार्थांच्या सूक्ष्मातिसूक्ष्म कणापर्यंत मनुष्य जाऊन पोहोचला, मात्र कुठेही त्याला पदार्थांव्यतिरिक्त ईश्वराच्या अस्तित्त्वाचा शोध लागला नाही. त्यामुळे सर्वत्र अणू-रेणूच आहेत, ईश्वर अस्तित्त्वातच नाही, असे गृहीतके लेखकाने या लेखात मांडले होते. मात्र पदार्थात ईश्वराचा शोध घेण्याचा प्रयत्न हा दिशाहीन असून ईश्वर हा पदार्थातीत आहे, तो पंचमहाभूतांच्या पलीकडील आहे, या वास्तवाचा त्यांना विसर पडलेला दिसतो.

इथे सर्वप्रथम हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, अणूरेणूंमध्ये शोध घ्यायला ईश्वर हा काही पदार्थ अथवा वस्तू नव्हे. ईश्वर हा प्रयोगशाळेतील परीक्षानळ्यांमध्ये तयार करण्याची किंवा दुर्बिणीच्या सहाय्याने अथवा सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहाय्याने दूरवर अथवा अणूरेणूंमध्ये, पेशींमध्ये शोधावयाची गोष्ट नाही. ईश्वर ही स्थूलरूपातील वस्तू नाही, हे इथे लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे ईश्वराचा शोध हा पृथ्वीवरील वस्तूमात्रांत घेता येणार नाही आणि घ्यावयाचा झाल्यास, तो अशा पद्धतीने तर नाहीच घेता येणार.

**ईश्वर म्हणजे काय, याबाबत अनेक धर्मग्रंथांमधून कित्येक सुस्पष्ट दाखले आलेले आहेत. ईश्वर हा प्रकाशस्वरूप आहे. तो एक दिव्य ज्योतिस्वरूप आहे, असे धर्मग्रंथांमधून नमूद करण्यात आलेले आहे. मात्र, हा प्रकाश किंवा ज्योति देखील चर्मचक्षूंना दिसणारा दृश्य प्रकाश नसून, तो दिव्य चक्षूंद्वारे अनुभवण्याचा दिव्य पारलौकिक प्रकाश आहे,** ही गोष्ट इथे लक्षात घेतली पाहिजे. ज्याप्रमाणे माणसाचे मन, बुद्धी यांचे अस्तित्त्व आहे हे स्पष्ट आहे; मात्र मन आणि बुद्धी ही सूक्ष्म अंगे चर्मचक्षूंनी दृश्यमान होणार नाहीत, तसेच ईश्वराचे आहे, ही गोष्ट प्रामुख्याने लक्षात घेतली पाहिजे. अनेक संतांनीही सांगितले आहे की, ईश्वराचा शोध हा अंतर्मनाच्या खोल गाभाऱ्यात शिरून घ्यावयाचा असतो. ईश्वराचा शोध घेण्यासाठी अंतर्मनात डोकावण्याची गरज आहे. पूर्वी हे सहज शक्य होते. मात्र, अलीकडे भौतिक सुखसुविधांचा अतिरेक झाला आहे. अशा स्थितीत मनुष्याचे बाह्यमन हे अधिक क्रियाशील झाले आहे आणि अंतर्मन (ज्याला सहावे इंद्रिय किंवा सिक्स्थ सेन्स असेही म्हटले गेले आहे.) सुप्तावस्थेतच राहिलेले आहे. त्यामुळे ईश्वराचा शोध त्याला घेता येत नाहीये. तो अंधारात चाचपडावे त्याप्रमाणे चाचपडत आहे. ईश्वराचा शोध घेण्यासाठी त्याला कासवाप्रमाणे सर्व कर्मेंद्रियांमधून लक्ष काढून घेऊन

ते अंतर्मनावर केंद्रित करावे लागेल. तसे झाल्यास त्याला आतून सर्वप्रथम आत्म्याचा प्रकाश दिसून येईल. एकदा का आत्मदर्शन प्राप्त झाले की, मग परमात्मदर्शन होण्यास वेळ तो कितीसा लागतो? **ज्याप्रमाणे रेणू - अणू - इलेक्ट्रॉन - न्यूट्रॉन - बोसॉन-गॉड्स पार्टिकल असा पदार्थविज्ञानाचा प्रवास सूक्ष्मातिसूक्ष्म होत गेला आहे, त्याप्रमाणेच ईश्वराचा शोध घ्यावयाचा झाल्यास अध्यात्मविज्ञानात शिरून सूक्ष्तातिसूक्ष्म असा विवेक-सद्बुद्धी - बहिर्मन - अंतर्मन - आत्मिक पातळी आणि परमात्म्याचा साक्षात्कार असा विकसित पावणारा आध्यत्मिक प्रवास करावा लागेल. त्यासाठी वेळ द्यावा लागेल.** पण आज घड्याळाच्या तालावर नाचणाऱ्या लोकलच्या प्रवासाला चिकटलेल्या आणि पुढील आयुष्यासाठी, मुला-बाळांसाठी धनदौलतीची तरतूद करण्यात गुंतलेल्या जिवांकडे इतका वेळ तो कुठून येणार?

एकोणिसाव्या शतकात तर विज्ञानाचा स्फोट झाला आणि मनुष्याचे ध्यान हे भौतिकतेत अधिकाधिक गुंतत गेले. आज एकविसाव्या शतकात तर विज्ञानाचा अतिरेक झाला आहे आणि त्याच्या मोबाईल, इंटरनेट, टेलिव्हिजनच्या मायाजालात मनुष्यप्राणी पुरता गुरफटला गेला आहे. त्याची सकाळ सुरू होते ती बातम्यांनी, हॅपनिंग्जनी आणि रात्र सरते तीही ब्रेकिंग न्यूजनेच. अशात त्याच्याकडे आत्मप्रकाशाचा, ईश्वराचा शोध घेण्यासाठी पुरेसा वेळ तरी आहे का, हा प्रश्नच आहे.

हे मान्य आहे की, ईश्वरी शक्तीचा शोध घेताना, काही गोष्टी या अकल्पित अशा धर्मग्रंथांमधून घुसडण्यात आल्या, ज्या आजही बुद्धीला पटत नाहीत. पण ही भेसळ बाजूला काढून, मूळ स्वरूपातील शुद्ध शिकवण लक्षात घेण्याची गरज आहे. प्रत्येक धर्मपित्याने ईश्वराचे त्याला आकलन झालेले, दिसलेले स्वरूप उलगडून सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे व त्या आकलनाचा मागोवा घेतला असता हे लक्षात येते की **ईश्वर हा एक दिव्य प्रकाश, ज्योति, नूर, लाईट, तेज आहे, ही बाब स्पष्ट आहे. मात्र तो प्रकाश दिव्य असून त्याच्या दर्शनासाठी मन आणि बुद्धीच्या सूक्ष्म अंतर्चक्षूंची गरज आहे.** हे सूक्ष्म चक्षूदेखील भौतिक सुखात आकंठ बुडाल्यामुळे त्यांची खोलवर पाहण्याची शक्ती (डेप्थ) क्षीण झाली आहे. त्यांना पुन्हा एकदा ती शक्ती प्रदान करण्यासाठी, म्हणजेच त्यांची शक्ती वाढविण्यासाठी नित्य साधनेची गरज आहे. 'प्रॅक्टीस मेक्स द मॅन परफेक्ट' या उक्तीनुसार, तुम्ही दररोज मन आणि बुद्धीचा स्वाध्याय केलात तर या धावपळीच्या जगात आजही अंतर्मनात डोकावण्याचे कसब तुम्हाला साध्य होऊ शकेल आणि म्हणतात ना जो विहिरीत पडला तो पोहायला शिकतोच, तद्वतच, एकदा का तुम्ही मनाच्या डोहात उतरलात की आपोआपच तुम्हाला आत्मदर्शन, परमात्मदर्शन होईल, यात शंका नाही अधिक माहितीसाठी जिज्ञासुंनी प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाला अवश्य भेट द्यावी आणि 'याचि देही याचि डोळा' परमात्म दर्शनाचा परमानंद अवश्य प्राप्त करावा. आजवर लाखो ब्रह्मावत्सांनी याची अनुभूती घेतली आहे.

■■

---

## आपल्या संकल्प शक्तीचे विशेष १६ प्रयोग

१. शक्तिशाली स्थिती बनविण्यासाठी
२. मायेवर विजय प्राप्त करण्यासाठी
३. सर्वांच्या विषयी शुभवृत्ती ठेवण्यासाठी
४. सदा सफलता प्राप्त करण्यासाठी
५. संबंधांना मधुर बनविण्यासाठी
६. क्रोधमुक्त बनण्यासाठी
७. गुणमूर्त बनण्यासाठी
८. संस्कार परिवर्तन करण्यासाठी
९. महान आत्मा बनण्यासाठी
१०. ड्रामा साक्षी होऊन बघण्यासाठी
११. नंबर वन मध्ये येण्यासाठी.
१२. डबल लाईट फरिश्ता बनण्यासाठी
१३. संपूर्ण पवित्र बनण्यासाठी
१४. निरंतर योगी बनण्यासाठी
१५. अपार खुशीत राहाण्यासाठी
१६. बापसमान बनण्यासाठी

# सद्गुरु बिना कौन बताए बात?

-ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे

सद्गुरु म्हणूनी महिमा करावी,
एकची त्या अजन्मा परमात्म्याची
महिमा ही करू नये, जन्म-मृत्यूचे
बंधन असणाऱ्या, मनुष्यात्म्याची ||१||

परमात्म्याच्या दर्शनार्थ,
जन्मजन्मांतर मानव शोधित आहे त्याजला
साकारी रूप नसते निराकाराला,
म्हणूनी शोध त्याचा नाही लागला ||२||

ऋषी मुनीही वदले, 'अंत कसा लागेल
आम्हा, बेअंत परमात्म्याचा?'
नाही लागला अंत म्हणूनी, एक सिद्धांत
ठोकिला, सर्वव्यापीचा ||३||

साधनेचे फळ म्हणूनी, प्राप्ती होते केवळ,
इष्ट देवांच्या साक्षात्काराची
साधका मात्र वाटते, मज प्राप्ती जाहली,
सर्वोच्च परमात्म्याची ||४||

ब्रह्मलोकातूनी अवतरण,
कधीच झाले आहे, शिवपरमात्म्याचे
स्वयं परमात्माच भूवरी येतो म्हणूनी,
संशोधन करू नये त्याचे ||५||

आपुला सत्य परिचय प्रगट करण्या,
निराकार साकार होतो
सत्यधर्म व सत्ययुगाच्या स्थापनार्थ,
तो ब्रह्मा तनात येतो ||६||

ब्रह्मामुखी शिववाणी प्रगटूनी,
शुभारंभ होतो संगमयुगाचा
अन् अलौकिक सोहळाही साजरा होतो,
साकार प्रभू मिलनाचा ||७||

ह्या विशेष युगावरी, परमात्माही शोधित
आहे, विशेष आत्म्यांना
त्याजला शोधावयाचे आहे,
पूर्वाश्रमीच्या सर्व देवात्म्यांना ||८||

निराकार आधार घेत नाही,
कोणा महंताच्या, साकार देहाचा
म्हणूनी कोणी विरळाच, भेद जाणतो,
त्याच्या अवतरणाचा ||९||

मच्छ, कच्छ, वराह अवतार मानणे,
अंध:कार हा धर्मग्लानीचा
अंध:कारासी ह्या दूर करण्या,
दीप लावूया, सत्यज्ञानाचा ||१०||

'साधारण तनात मी प्रवेश करतो'
महावाक्य हे भगवद्गीतेचे
ह्याची महावाक्यात गुह्य ज्ञान आहे,
परमात्म अवतरणाचे ||११||

'मज परमात्म्याच्या स्वरूपा,
जो जाणीत नाही, तो असे मूढ?'
श्रीमद् भगवद्गीतेतील टीका ही,
भगवंताची किती गूढ! ||१२||
(अ. श्लोक ९-११)

सत्ययुगात देवत्वपद प्राप्त होणे,
हीच सद्गती आत्म्याची
पुजाऱ्याला पूज्य बनविणे,
ही किमया, केवळ त्या सद्गुरूची ||१३||

सर्व धर्मातील सर्व आत्म्यांनो,
जाणा आपुल्या परमपित्याला
जीवनमुक्तीचा विशेष वारसाहक्क,
देण्या आला आहे, सर्व आत्म्यांना ||१४||

सद्गुरूच्या ज्ञानप्रसादाने,
संगम युगी जीवन होते हिरेतुल्य
प्रारब्ध रूपात, सत्ययुगी दैवी
जीवन होईल, सुवर्णतुल्य ||१५||

संगमयुगाविना, सर्वोच्च आत्म कल्याण,
संभव होत नसते
कल्पातील ही अति दुर्लभ संधी, प्रत्येक
आत्म्यासाठी असते ||१६||

हे आत्मन, परमात्म प्राप्तीपासून,
तू राहिला आहेस वंचित
अधिक विलंब केल्यास, जमा होणार नाही,
तुझे सत्ययुगी संचित ||१७||

सद्गुरू अवतरणाचा हा संदेश, समस्त
आत्म्यांना प्राप्त होतो
सद्शिष्य त्यालाची म्हणावे, जो स्वकल्याण
व विश्वकल्याण साधतो ||१८||

ज्याने नाही ओळखिले सद्गुरूला,
त्यासी दु:ख होईल अंतर्मनी
अंतकाली पश्चात्तापाचे अश्रू येतील
लाखो साधकांच्या लोचनी ||१९||

सत्ययुग निर्मितीपूर्व, महाविनाशाची
सावली आहे जगतावरी
विनाश प्रक्रियेत, आत्म्यांना परत
जायचे आहे, आपुल्या मूळ घरी ||२०||

निजधामी जाताना, आत्मा कोणती
शिदोरी, घेणार आहे बरोबरी?
बंधुंनो, बरोबरी येते की केवळ,
आपुल्याच कर्मफलांची शिदोरी ||२१||

सात्विक कर्मांचे बीज पेरूनी,
'सात्विक' जीवनाचा आनंद घ्यावा
नवयुग स्थापनेच्या सर्वश्रेष्ठ कार्यात,
सद्गुरुला सहयोग द्यावा ||२२||

सकलांच्याच सहयोगाने, भारतभूमीवरी
स्वर्ग निर्माण होईल
श्री. लक्ष्मी नारायणाचे सत्ययुगी
दैवी राज्य उदयास येईल ||२३||

सत्ययुगाचा वैभवशाली इतिहास,
सद्गुरूलाच आहे ज्ञात
म्हणूनी म्हटले आहे
'सद्गुरू बिना कौन बताए बात?' ||२४||

अनुभव

# जेथे जातो तेथे, तू माझा सांगाती



- ब्र.कु. देवेंद्र, मुलुंड (मुंबई)

आजही भारतात खेड्या-पाड्यातील लोकांना रेल्वे पाहायला मिळत नाही. काही ठिकाणी तर मोटारगाडी आली तरी लोक तिच्याभोवती गोळा होतात. अशा ठिकाणी जर गावातील लोकांना अचानक रेल्वे ट्रेन पाहायला मिळाली तर त्यांच्या आश्चर्याला पारावर उरत नाही. त्यामुळे मुलुंड सब झोनच्या प्रभारी राजयोगिनी गोदावरी दीदींना संकल्प आला की अशा भागात आपण शिवबाबांचा संदेश देणारी ट्रेन अवश्य नेली पाहिजे. फलस्वरूप लोक आपोआपच आकर्षित होतील व उत्तम प्रकारे ईश्वरी सेवा संपन्न होईल. त्यासाठी शिवदर्शन एक्स्प्रेस ट्रेन जी रस्त्यावरून चालते, ती नाशिक येथून मागविण्यात आली व मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पालघर, रायगड इत्यादी जिल्ह्यातून ३३ दिवसांकरिता सुमारे ५ हजार कि.मी. ची रेल्वेयात्रा 'राजयोगाद्वारे समाज विकास अभियान' या नावाने आयोजित करण्यात आली. या अभियानाद्वारे सुमारे एक करोड पेक्षाही अधिक मनुष्य आत्म्यांना ईश्वरी संदेश देण्यात आला. या ३३ दिवसाच्या यात्रेअंतर्गत शिवबाबांच्या मदतीचे मला जे विशेष अनुभव आले, ते प्रस्तुत लेखात आपल्यापुढे मांडत आहे. ते अतिशय हृदयस्पर्शी असे आहेत.

शिवदर्शन एक्स्प्रेस ट्रेनला एक इंजिन व तीन डब्बे होते. मुख्य म्हणजे ती गाडी रिवर्स होत नव्हती. त्यामुळे रोज रात्री पार्किंग करताना मोठी जागा शोधावी लागत असे. एका सेवाकेंद्रावर आम्ही पोहोचलो; परंतु तेथे पार्किंगसाठी जागा नव्हती. त्यामुळे थोड्या दूर अंतरावर एक मोठ्या रस्त्याच्या कडेला आम्ही ट्रेन नेऊन उभी केली. त्या रस्त्याच्या बाजूला झाडीझुडपी पसरली होती. बाजूने एक नाला वाहत होता. रस्त्यावर लाईट नसल्याने, सर्वत्र अंध:कार पसरला होता. या अंधारात माझ्या शर्टमध्ये काहीतरी घुसले होते. अधून–मधून अंगाला खाज सुटत होती. मधूनच गार–गार वाटत होते. मी लगेचच माझ्या बरोबरच्या सेवाधारीला काही दिसते का बघ, म्हणून सांगितले. त्याने अंधारात वर–वर चेक करून सांगितले की काही नाही. त्यानंतर आम्ही सेवाकेंद्रावर आलो व जेवायला बसलो. तेव्हा माझ्या लक्षात आले की माझ्या बनियनच्या आत खांद्यावर काही तरी चालत आहे. लगेचच मी हाताच्या मुठीत त्याला दाबून टाकले. नेमकं



**शिवदर्शन एक्स्प्रेस ट्रेन जी रस्त्यावरून चालते, जी नाशिक येथून मागविण्यात आली व मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पालघर, रायगड इत्यादी जिल्ह्यातून ३३ दिवसांकरिता सुमारे ५ हजार कि.मी. ची रेल्वेयात्रा 'राजयोगाद्वारे समाज विकास अभियान' या नावाने आयोजित करण्यात आली. या अभियानाद्वारे सुमारे एक करोड पेक्षाही अधिक मनुष्य आत्म्यांना ईश्वरी संदेश देण्यात आला.**

काय दाबले, हे मात्र मलाही समजले नव्हते. मी धावतच बाथरूममध्ये गेलो व अंगावरील शर्ट व बनियन काढून टाकला; तेव्हा माझ्या लक्षात आले की ती भली मोठी पाल होती. आश्चर्याची बाब म्हणजे सुमारे १०/१५ मिनिट ती पाल माझ्या अंगावर होती परंतु मला तिच्यापासून कुठलाही त्रास झाला नाही. ही सर्व शिवबाबांची मदत होती. एरवी समजा आपण खुर्चीत बसलेले असलो आणि आपल्या दिशेने जरी पाल येतांना दिसली तरी आपण ताडकन खुर्चीतून उडी मारतो. परंतु त्यावेळी माझी अशी अशरीरी स्थिती बनली होती की मला काहीच वाटलं नाही. पाहणाऱ्यांना मात्र मोठं आश्चर्य वाटलं.

दुसऱ्या दिवशी आम्ही सेवेसाठी एका गावात गेलो. दिवसभर आम्ही सर्व गावकऱ्यांना शिवबाबांचा संदेश दिला. रात्री ११ वाजता आम्ही एका ठिकाणी झोपायला गेलो. दिवसभर सेवा करून शरीर थकल्याने, लगेचच झोप आली; परंतु थोड्याच वेळात तेथील लाईट गेली. त्यामुळे पंखे बंद होताच, मच्छर चावायला लागले. सगळ्यांची झोपमोड झाली. तेथील रहिवासी भाई आम्हाला म्हणाला की आता लाईट येण्याची शक्यता फार कमी आहे. कारण गावाला होणारा विजेचा पुरवठा हा दूरवरच्या शहरातून होतो. त्यावेळी मी शिवबाबांना सांगितले की बाबा, दहा मिनिटात वीज आलीच पाहिजे. खरोखर दहा मिनिटात वीज आली. थोड्या वेळाने पुन्हा लाईट गेली. आता मात्र मी शिवबाबांना सांगितले की, दोन मिनिटात काहीही करून लाईट आली पाहिजे. आश्चर्य म्हणजे दोन मिनिटात लाईट आली. तेथील रहिवाशांना हा अनुभव नवीन होता कारण तेथे एकदा गेलेली लाईट काही तासांनंतरच येते. या ठिकाणी वाचकांना मला हे सांगावेसे वाटते की आपण ईश्वरी सेवेसाठी निमित्त बनल्यावर, शिवबाबा प्रत्येक पाऊलावर आपली मदत अवश्य करीत असतो. किंबहुना तो अदृश्यरित्या आपल्याबरोबरच असतो. हाच भाव पुढील ओळीत अतिशय सुंदरपणे मांडण्यात आला आहे.

**तुम तो यही कही बाबा,**
**मेरे आसपास हो।**
**आते नजर नही पर,**
**मेरे साथ-साथ हो।**

पुढे आम्हाला एक जिल्हा सोडून दुसऱ्या जिल्ह्यात जायचे होते साधारण १०-१२ तासाचा प्रवास होता. मध्यंतरी २-३ पर्वतातील रस्ते पार करायचे होते. रस्त्यात एका शहरात एक ओव्हरब्रिज लागला. जशी आमची गाडी त्या ओव्हरब्रिजवर चढली; अचानक आमच्या गाडीचा ब्रेक फेल झाला. त्यावेळी आमची गाडी ५० ते ६० कि.मी.च्या वेगाने धावत होती. ड्रायव्हर गाडी थांबवण्याचा खूप प्रयत्न करीत होता; परंतु त्याला यश येत नव्हते. गियर डाऊन करूनही गाडी थांबत नव्हती. ड्रायव्हर सर्व शक्तिनिशी प्रयत्न करीत होता; आमच्यापुढे चालणाऱ्या गाडीच्या जवळ आमची गाडी येत होती. अशावेळी आम्ही सर्वांनी अगदी मनापासून शिवबाबांची आठवण केली. फलस्वरूप अतिशय मोठा चमत्कार झाला व आमची गाडी थांबली. शिवबाबांनीच ती गाडी थांबवली होती. अन्यथा फार मोठा ॲक्सीडेंट झाला असता. त्यावेळी रस्त्यावरून चालत जाणाऱ्या माणसांनाही आश्चर्य वाटले व ते म्हणाले देखील की हा खरोखर ईश्वरी शक्तीचा चमत्कार आहे. अशा रीतीने शिवबाबांनी आम्हा सर्वांचा जीव वाचवला. आम्हा प्रिय मुलांची रक्षा केली. याचेच गायन केले जाते....

**'जिसको राखे साई,**
**उसे मार सके ना कोई।'**

वरील प्रसंगांवरून आपल्या लक्षात आले असेलच की आपण परमपिता शिव परमात्म्याचे बनल्यानंतर तो सदैव आपली सहाय्यता करीत असतो. आपण सर्वांनी देखील याचा अनुभव आपल्या जीवनात अवश्य घ्यावा. त्यासाठी सर्वांना हेच नम्र निवेदन आहे की परमात्म प्राप्तीसाठी आपल्या जवळच्या ब्रह्माकुमारी सेवाकेंद्राशी त्वरित संपर्क करा. वास्तविक परमात्म प्राप्ती हेच मनुष्य जन्माचे सर्वश्रेष्ठ लक्ष्य आहे. तसेच ती प्राप्ती वर्तमान समयीच होऊ शकते. शेवटी मला प्राप्त झालेल्या ईश्वरी स्नेहाने ऊर भरून येते व हाच विश्वास मनात भरून राहतो –

**दिव्य तुझ्या स्नेहाने माझा,**
**जन्म सफल झाला।**
**सहवासाचे आठविता क्षण,**
**ऊर भरून आला।**
**झाली पूर्ण मनाची आस-माझ्या**
**संगे असती बाबा,**
**आहे मज विश्वास।।** ■■

# आध्यात्मिक विकासाद्धारेच समाजाचा सर्वांगीण विकास संभव

- **मा.श्री.देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य

**शांतिवन (आबू रोड) :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्र फडणवीस यांनी दि.१६ जानेवारी २०१६ रोजी ब्रह्माकुमारी संस्थेच्या मुख्यालयाला भेट दिली. तसेच संस्थेच्या मुख्य प्रशासिका दादी जानकीजी, राजयोगिनी हृदयमोहिनीजी व राजयोगिनी रतनमोहिनीजी यांची भेट घेतली. **दादीजींना भेटल्यावर त्यांना जी सकारात्मक ऊर्जा प्राप्त झाली; ती अन्य कुठेही मिळाली नव्हती, असे उद्‌गार त्यांनी काढले.** तसेच डायमंड हॉलमध्ये महाराष्ट्रातील १५ हजार ब्रह्मावत्सांपुढे भाषण करताना त्यांनी प्रतिपादन केले की आध्यात्मिक उन्नतीद्वारेच समाजाचा सर्वांगीण विकास संभव आहे.

ते पुढे म्हणाले की आज संपूर्ण विश्व भौतिकतेच्या मागे लागले आहे. भौतिकतेने नैतिकतेपेक्षाही जास्त शक्ती वाढवली आहे. परिणामतः अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत व आज जगात सर्वत्र संघर्षमय परिस्थिती दिसून येत आहे.

आजवर सनातन धर्माने वा वैदिक धर्माने जो विचार केला तो विश्वाच्या कल्याणाचा अथवा विश्वाच्या शांतीचा. हा विचार एखाद्या मनुष्याच्या शांतीचा; एखाद्या राज्याचा शांतीचा, एखाद्या देशाच्या शांतीचा विचार नव्हता, तर तो विचार होता संपूर्ण चराचराच्या शांतीचा, अवघ्या विश्वाच्या शांतीचा. फलस्वरूप समाजाचा सर्वांगीण विकास साधला जात होता. परंतु आजच्या विज्ञान युगात मनुष्याची केवळ भौतिक प्रगती झाली आहे. त्यासोबत मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक प्रगती मात्र झाली नाही. त्यामुळे अशी ही भौतिक प्रगती काही कामाची नाही. कारण त्यातून मनुष्याला स्थायी सुख-शांती मिळू शकत नाही.

**आज अनेक मोठ्या देशांनी भौतिक विकास केला आहे. त्यांच्या पायाशी भौतिक सुखे लोळत आहेत. परंतु तेथील जनतेची मानसिक स्थिती कशी आहे? ते अत्यंत दुःखी आहेत. तेथील लहान-लहान मुलांना सुद्धा डिप्रेशनच्या गोळ्या घ्याव्या लागत आहेत. यावरून स्पष्ट होते की भौतिक विकासाला जोपर्यंत नैतिक वा आध्यात्मिक विकासाची जोड दिली जात नाही, तोपर्यंत भौतिक विकास हा शाश्वत विकास होऊ शकत नाही. ब्रह्माकुमारी संस्थेसारख्या ज्या संस्था आहेत तेथे आंतरिक विकास वा आध्यात्मिक विकास साधला जातो. त्यामुळे त्यांचे कार्य खरोखरच वंदनीय आहे.**

आदरणीय दादीजींच्या कडून मला जी सकारात्मक ऊर्जा मिळाली; मला वाटतं की हीच ऊर्जा जीवनात सर्वात महत्त्वाची आहे. मुख्य म्हणजे चांगल्या विचारात, चांगल्या वातावरणात राहिल्यानंतर आपल्याला चांगल्या कार्याची प्रेरणा आपोआपच प्राप्त होते. दादीजींसारख्या उर्जावान लोकांची जेव्हा आपण भेट घेतो तेव्हा त्यांच्या स्पर्शाने वा दृष्टीने त्या आपल्यात सकारात्मक ऊर्जा प्रवाहित करतात. त्यातूनच आपल्याला भविष्यातील वाटचालीसाठी एक मार्ग मिळत असतो.

आपण जाणतो की प्रत्येक मनुष्य हा आपल्या स्वार्थाचा विचार करतो; परंतु एक वेळ अशी येते की तो व्यक्तिगत विचार सोडून समाजाचा, संपूर्ण समष्टीचा विचार करायला लागतो ज्यावेळी विवेकानंद हे स्वामी रामकृष्ण परमहंसांना भेटायला गेले तेव्हा त्यांनी पाहिले की स्वामीजी अत्यंत गरिबीत आहेत.दुःख भोगत आहेत ते पाहून विवेकानंद म्हणाले की तुमची काली माता काय करते? तुम्ही इतके दुःखी असताना, तुमचे दुःख माता का दूर करीत नाही?

तेव्हा स्वामी रामकृष्ण परमहंस हसले आणि विवेकानंदांना म्हणाले की तू असं कर; तूच त्या काली मातेकडे जा आणि स्वतःसाठी, माझ्यासाठी तसेच सर्वांसाठी काय मागायचे ते माग. त्याप्रमाणे विवेकानंद देवीपुढे गेले व दोन मिनिटे मन एकाग्र करून उभे राहिले. परत आल्यावर परमहंसांनी प्रश्न केला की देवीजवळ तू काय मागितलेस? त्यावेळी विवेकानंदांनी हेच उत्तर दिलं की देवीच्या पुढे उभे असताना मी स्वतःसाठी किंवा तुमच्यासाठी काहीच मागितले नाही. माझ्या डोळ्यासमोर फक्त दुःखी जनता येत होती. त्यांच्या सुखाची कामना मी देवीपुढे केली. **तीच गोष्ट मला या संस्थेत दिसून येत आहे. येथे सर्व जण विश्वाला शांती व सुखाची अनुभूती व्हावी म्हणून योगदान देत आहेत. या विश्वातील अज्ञान अंध:कार दूर करण्याचा प्रयत्न करीत आहेत.** खरं तर आज या जगात जो संघर्ष चालू आहे; याचे वास्तविक कारण अज्ञान अंधकारच आहे.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून पूर्ण केल्यावर विश्वात्मक देवाकडे जे पसायदान मागितले, ते सुद्धा विश्वकल्याणाचे. तसेच मी सुद्धा येथून जेव्हा महाराष्ट्रात परत जाईन तेव्हा तेथील जनतेच्या, दुष्काळ पीडित शेतकऱ्यांच्या जीवनात नवीन ऊर्जा (शक्ती) प्रदान करण्याचे कार्य करीन. आज मी येथून जात आहे परंतु लवकरच परत येण्याकरिता. मला येथे येऊन खूपच आनंद वाटला. शेवटी सर्वांचे कल्याण होवो, हीच शुभभावना मी व्यक्त करतो. जय महाराष्ट्र! ■■